शनिवार, २ ऑक्टोबर २०२१
◆ वर्ष १४ ◆ अंक ७५
www.ramprahar.com
# राम प्रहर
◆ पाने ६ ◆ किंमत ₹ २ ◆ रायगड

## अंतरंग

राज्यात कधीही निवडणूक लागू शकते -शेलार/२
राष्ट्रवादीशी आघाडी नाहीच; शिवसेनेचे नवगणे गरजले/५
भारताच्या स्मृती मंधानाने रचला इतिहास/६

## अनिल देशमुखांना कोर्टाकडून समन्स जारी



**मुंबई :** १०० कोटी वसुलीचे आरोप असलेले माजी गृहमंत्री अनिल देशमुख यांच्या अडचणीत आणखी वाढ झाली आहे. चीफ मेट्रोपोलिटन कोर्टाकडून शुक्रवारी (दि. १) देशमुखांना समन्स जारी करण्यात आले असून १६ नोव्हेंबरपर्यंत भूमिका स्पष्ट करण्याचे निर्देश त्यांना देण्यात आले आहेत. देशमुख तपासात सहकार्य करीत नसल्यामुळे ईडीने विशेष न्यायालयात याचिका दाखल केली होती. त्यावर ही सुनावणी घेण्यात आली. हवालामार्फत सुमारे चार कोटी रुपये देशमुख यांच्या मालकीच्या साई शिक्षण संस्थेच्या खात्यात जमा झाल्याने ते आणखी अडचणीत आले आहेत. प्राप्तिकर विभागाने देशमुखांच्या घरी प्रथमच छापे टाकले होते. वारंवार नोटीस देऊन उपस्थित राहत नसल्याने देशमुख यांच्या विरोधात लुकआऊट नोटीस बजावण्यात आली आहे. सुमारे महिनाभरापासून ते अज्ञातस्थळी आहेत.

# पनवेलमध्ये आज गर्भाशय कॅन्सर प्रतिबंधात्मक लसीकरण महाशिबिर



### केंद्रीय आरोग्य राज्यमंत्री डॉ. भारती पवार यांची लाभणार उपस्थिती

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

सेवा व समर्पण अभियान अंतर्गत जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे खांदा कॉलनी येथील चांगू काना ठाकूर (सीकेटी) महाविद्यालय, श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ आणि कॅन्सर पेशंट्स ऐड असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने शनिवारी (दि. २) पनवेलमध्ये गर्भाशय मुखाच्या कॅन्सरवर प्रतिबंधात्मक लसीकरण महाशिबिर आयोजित करण्यात आले आहे. या महाशिबिराचे उद्घाटन केंद्रीय आरोग्य व कुटुंब कल्याण राज्यमंत्री डॉ. भारती पवार यांच्या हस्ते आणि माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अध्यक्षतेखाली सकाळी ९.३० वाजता होणार आहे.

खांदा कॉलनी येथील सीकेटी महाविद्यालयात होणाऱ्या या कार्यक्रमास रायगडचे माजी पालकमंत्री व विद्यमान आमदार रवींद्र चव्हाण, आमदार महेश बालदी, युवा मोर्चाचे प्रदेशाध्यक्ष विक्रांत पाटील यांची प्रमुख उपस्थिती लाभणार असून या कार्यक्रमाचे निमंत्रक भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर आणि महापौर डॉ. कविता चौतमोल आहेत.

महिलांमध्ये धडकी भरवणारा सर्व्हिकल म्हणजेच गर्भाशय मुखाचा कॅन्सर ही जगभर मोठी समस्या आहे. या कॅन्सरची तपासणी करण्यासाठी एचपीव्ही नामक चाचणी करावी लागते. ही चाचणी महागडी असल्याने महिला याकडे दुर्लक्ष करतात. या कॅन्सरच्या निर्मूलनासाठी जगभरात वेगवेगळे प्रयोग सुरू आहेत. त्या दृष्टीने या लसीकरण महाशिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. याचा लाभ ११ ते १८ वर्षापर्यंतच्या मुलींना घेता येणार असून किमान एक हजार मुलींचे लसीकरण करण्यात येणार असून त्याच्या यशस्वी नियोजनासाठी महिला मोर्चा सज्ज आहे.

# राज्य सरकारच्या घोषणा हवेत विरल्या

## ■ शेतकऱ्यांना मदत न मिळाल्याने फडणवीसांचा हल्लाबोल

**नागपूर : प्रतिनिधी**

मराठवाड्यात अतिवृष्टीनंतर निर्माण झालेल्या परिस्थितीवर राज्य सरकारने घेतलेल्या भूमिकेवर राज्याचे विरोधी पक्षनेते आणि माजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नागपूरमध्ये पत्रकारांशी बोलताना ताशेरे ओढले आहेत. सरकारच्या सर्व घोषणा हवेत विरल्या आहेत. कोणत्याही घोषणेची पूर्तता झालेली नाही. इतक्या नैसर्गिक आपत्तींमध्ये केलेल्या घोषणा कागदावर राहिल्या आहेत. त्या शेतकऱ्यांपर्यंत पोहचलेल्या नाहीत हे वास्तव आहे, असे फडणवीस म्हणाले.

फडणवीस यांनी पुढे म्हटले की, मंत्री किंवा राज्यातील प्रमुख लोक तिथे गेले, तर प्रशासनदेखील जागे होत असते आणि लोकांना काहीतरी दिलासा मिळत असतो. अशा परिस्थितीत कुणीतरी आपले ऐकतेय असे लोकांना वाटत असते आणि ते महत्त्वाचे असते. आम्हीदेखील उद्यापासून मराठवाडा दौऱ्यावर जाणार आहोत. तिथली परिस्थिती सरकारपर्यंत पोहचवून जास्तीत जास्त मदत मिळवून देण्याचा प्रयत्न करू.

पहिल्यांदा नजर आणेवारीच्या आधारावरच मदत करता येते. वैयक्तिक पंचनाम्याची आवश्यकता पडत नाही. पंचनामे होत राहतील, पण आधी तातडीची मदत काय करता येईल याचा सरकारने विचार करण्याची गरज आहे, असेही फडणवीसांनी नमूद केले.



### नुकसानीची पाहणी

**यवतमाळ :** राज्याचे विरोधी पक्षनेते आणि माजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अतिवृष्टीमुळे नुकसान झालेल्या यवतमाळ जिल्ह्यातील निळापूर येथे शेतावर जाऊन पाहणी केली. कापूस, सोयाबीनचे चांगले पीक आले असताना पावसामुळे नुकसान झाले आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना राज्य सरकारने तातडीने मदत केली पाहिजे, अशी मागणी फडणवीसांनी या वेळी केली.

### काँग्रेसच्या नाना पटोलेंना टोला

मुंबईचे माजी पोलीस आयुक्त परमबीर सिंह नेमके कुठे आहेत यावरून सध्या जोरदार चर्चा सुरू झाली आहे. या पार्श्वभूमीवर काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी भाजपवर गंभीर आरोप केला आहे. परमबीर सिंह यांना देशाबाहेर जाण्यासाठी केंद्राने मदत केल्याचे वक्तव्य पटोलेंनी केल्यानंतर फडणवीस यांनी पटोले यांना टोला लगावला आहे. नाना पटोले काहीही बोलत राहतात. त्यांच्या प्रत्येक गोष्टीचे उत्तर देता येणार नाही. पटोले असे व्यक्ती आहेत की ते अमेरिकेच्या अध्यक्षांच्या बाबतीतदेखील बोलू शकतात, असे फडणवीस म्हणाले.





(छाया : लक्ष्मण ठाकूर)

# आजिवली येथे शासकीय दाखले वाटप शिबिराला उदंड प्रतिसाद

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

आमदार प्रशांत ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली केलेल्या मागणीनुसार आजिवली येथे जनता विद्यालयात शुक्रवारी (दि. १) शासकीय दाखले वाटप शिबिर उत्साहात झाले. या शिबिराचा शेकडो नागरिकांनी लाभ घेत उपक्रमास उदंड प्रतिसाद दिला.

या शिबिराला भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांची प्रमुख उपस्थिती लाभली, तर शिबिराचे उद्घाटन भाजपचे तालुका मंडल अध्यक्ष अरुणशेठ भगत यांच्या हस्ते करण्यात आले. या वेळी पनवेल महापालिकेचे सभागृह नेते परेश ठाकूर, भाजपचे तालुका उपाध्यक्ष संजय पाटील, सरचिटणीस राजेंद्र पाटील, पळस्पे विभागीय अध्यक्ष अनेश ढवळे, जिल्हा परिषद सदस्य अमित जाधव, ज्येष्ठ नेते सुभाष पाटील, कोन ग्रामपंचायतीचे सरपंच निलेश म्हात्रे, कसळखंड ग्रामपंचायतीचे माजी सरपंच अनिल पाटील, युवा मोर्चा तालुका अध्यक्ष आनंद ढवळे, ज्येष्ठ कार्यकर्ते आप्पा भागीत, ज्ञानेश्वर पाटील, युवा नेते योगेश लहाने, घनश्याम पाटील, महेंद्र गोजे, जनता विद्यालयाचे मुख्याध्यापक श्री. जाधव यांच्यासह तहसील कार्यालय अधिकाऱ्यांची उपस्थिती होती.

या बातमीचा व्हिडीओ पाहण्यासाठी हा क्यूआर कोड स्कॅन करा

रेशनकार्ड, उत्पन्न दाखला, जातीचा दाखला, डोमिसाईल, आधार कार्ड, वय व अधिवास, अशा विविध शासकीय दाखल्यांसाठी विद्यार्थी व नागरिकांना पनवेल तहसील कार्यालयात फेऱ्या माराव्या लागतात. अशा परिस्थितीत वेळ आणि आर्थिक भुर्दंड पडत असतो. **(पान २ वर..)**

# खासदार भावना गवळींना 'वर्षा'वर नो एण्ट्री!

### गेटवरूनच परतल्या माघारी

**मुंबई : प्रतिनिधी**

शिवसेनेच्या खासदार भावना गवळी या शुक्रवारी (दि. १) वर्षा बंगल्यावर मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या भेटीला गेल्या होत्या. त्या अर्धा तास गेटवर ताटकळत उभ्या होत्या, मात्र मुख्यमंत्री कार्यालयाकडून त्यांना कुठलीही भेट देण्यात आली नाही. त्यामुळे त्या गेटवरूनच माघारी फिरल्या. खासदार गवळी यांच्यामागे ईडीचा ससेमिरा लागल्याने मुख्यमंत्र्यांनी भेट नाकारली, अशी चर्चा सुरू आहे.



खासदार भावना गवळी यांच्या बालाजी पार्टिकल बोर्ड कारखान्यात १०० कोटींचा घोटाळा झाल्याचा आरोप आहे. या प्रकरणात सक्तवसुली संचालनालयाने (ईडी) गवळी यांच्याशी संबंधित असलेल्या यवतमाळ व वाशिम येथील पाच संस्थांवर याआधीच छापे टाकले होते, तसेच संबंधित अधिकाऱ्यांचीही चौकशी करण्यात आली होती. तेव्हापासून गवळी ईडीच्या रडारवर असून त्यांच्यावर झालेल्या आरोपांची शहानिशा ईडीकडून केली जात आहे. भावना गवळी महिला प्रतिष्ठान या ट्रस्टला कंपनीत परावर्तीत केल्याचाही त्यांच्यावर आरोप आहे. याच प्रकरणात काही दिवसांपूर्वी गवळींचे निकटवर्तीय सईद खान यांना अटक करण्यात आली. त्यामुळे गवळींच्या अडचणींमध्ये वाढ होण्याची शक्यता बळावली आहे. त्यामुळेच मुख्यमंत्र्यांनी त्यांना प्रवेश दिला नसल्याची चर्चा आहे.

# आनंद अडसूळांना दिलासा देण्यास हायकोर्टाचा नकार



**मुंबई :** सिटी सहकारी बँक घोटाळ्याप्रकरणी शिवसेनेचे माजी खासदार आनंद अडसूळ यांना ईडीने समन्स बजावले होते. त्या विरोधात अडसूळ यांनी उच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती, मात्र उच्च न्यायालयाने त्यांना दिलासा देण्यास नकार दिला आहे. ईडीने बजावलेले समन्स आणि गुन्हा रद्द करण्यासाठी, तसेच याचिकेवरील सुनावणी प्रलंबित असेपर्यंत अटकेपासून अंतरिम संरक्षण द्यावे, अशी विनंती अडसूळ यांनी न्यायालयाला केली होती, मात्र न्यायालयाने अडसूळ यांच्या याचिकेत सुधारणा करण्याची मुभा देत सुनावणी ८ ऑक्टोबरपर्यंत तहकूब केली आहे.

भाडे के घरसे छुटकारा पाइये
अपने खुद के घर मे रहने का सुवर्ण अवसर
पनवेल स्टेशन (ईस्ट) से २ से ४ कि.मी. दायरे के अंदर पूर्ण सुविधा के साथ अपना घर बसाईये.
१ रुम किचन, १ बीएचके, २ बीएचके
५,००,००० + स्टॅम्प ड्युटी रजिस्ट्रेशन के साथ घर का ताबा
बाकी लोन की जिम्मेदारी हमारी!
निधी एन्टरप्रायजेस फायनान्स कन्स्ल्टंट, प्रॉपर्टी डिलर
शॉप नं. ३, आदिशक्ती, को. ऑप. सोसायटी, उत्सव हॉटेल के बाजूमे, न्यू पनवेल ४१० २०६
संपर्क : ८४५२९८३७०८

## शिवसेना शाखाप्रमुख, रिक्षा संघटना अध्यक्ष समर्थकांसह भाजपमध्ये



**पनवेल : शिवसेना शाखाप्रमुख सोमनाथ पवार यांनी सहकाऱ्यांसह तसेच महाराष्ट्र रिक्षा चालक मालक संघटनेचे तालुका अध्यक्ष सुनील कुंदन यांनी नाका प्रमुख आणि रिक्षाचालकांसह शुक्रवारी भाजपमध्ये प्रवेश केला. सर्व प्रवेशकर्त्यांचे भाजप उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांनी भाजपची शाल देऊन पक्षात स्वागत केले.** (वृत्त व अधिक छायाचित्रे पान ३ वर..)

# आता वेध नवरात्रोत्सवाचे

**मुरूड : प्रतिनिधी**

गणेशोत्सवानंतर भाविकांना आता नवरात्रोत्सवाचे वेध लागले आहेत. येत्या गुरुवारी (दि. ७) देवीची घटस्थापना करण्यात येणार आहे. त्यामुळे कारागीरांची देवीच्या मूर्तीवर अखेरचा हात फिरविण्याची लगबग सुरू आहे.

नवरात्रोत्सवामध्ये लागणाऱ्या वस्तूंनी बाजारपेठ फुलू लागली आहे. या उत्सवात देवीची नऊ दिवस पूजा केली जाते. त्यासाठी लागणारे साहित्य खण, वेणी, कापूर, धूप व इतर साहित्याने बाजारपेठ सजू लागली आहे.



दांडिया व आकर्षक कपड्यांनी बाजारपेठ लक्षवेधी झाली आहे. या उत्सवासाठी विविध सार्वजनिक मंडळेही सज्ज झाली आहेत. देखाव्यासाठी विविध प्रकाराच्या लाईट्स बाजारपेठेत उपलब्ध झाल्या आहेत. दरम्यान, यंदाही नवरात्रोत्सवावर कोरोनाचे सावट असल्याने नियम पाळावे लागणार आहेत.

## 'एअर इंडिया'वर पुन्हा टाटा समूहाची मालकी

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

गेल्या अनेक दिवसांपासून चर्चेत असलेल्या एअर इंडिया कंपनीची मालकी ६७ वर्षांनंतर पुन्हा एकदा देशातील टाटा सन्सकडे आली आहे. त्यामुळे एअर इंडियामधील दीर्घकाळ रखडलेली निर्गुंतवणुकीची प्रक्रियाही संपुष्टात आली आहे.

एअर इंडियावरील मालकी हक्कासाठी चार निविदा आल्या होत्या. त्यामध्ये टाटा सन्ससोबत स्पाइसजेटचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक अजय सिंग हेही स्पर्धेत होते. यात टाटा सन्सने बाजी मारली.



# राज्यात कधीही निवडणूक लागू शकते

## ■ आघाडीतील परिस्थितीवरून आशिष शेलारांचे विधान

**पुणे : प्रतिनिधी**

राज्यात सत्ताधारी तीन पक्ष आणि विरोधी पक्ष असलेल्या भाजपमध्ये सातत्याने आरोप-प्रत्यारोप होत असल्याचे चित्र राज्यात आहे. या पार्श्वभूमीवर राज्य सरकारमधल्या तिन्ही पक्षांमध्ये विसंवाद असल्याची टीका केली जात असतानाच भाजप आमदार आशिष शेलार यांनी राज्यात केव्हाही निवडणूक लागू शकेल, असे विधान केले.

शेलार हे पुण्याच्या मावळ दौऱ्यावर आहेत. या दौऱ्यामध्ये भाजपच्या पदाधिकारी-कार्यकर्ता मेळाव्यामध्ये बोलत असताना त्यांनी हे विधान केल्यामुळे पुन्हा एकदा राज्यात निवडणुकांची चर्चा सुरू झाली आहे. आशिष शेलार यांच्या या विधानामुळे राज्यात तर्क-वितर्कांना उधाण आले आहे. शेलार यांनी राज्यातील तिन्ही सत्ताधारी पक्षांवर टीका केली आहे.

'ज्या पद्धतीने तीन पक्षांत आपापसात विसंवादाची रोज लढाई लागली आहे आणि त्या तीन पक्षातील दोन पक्षांचे जे संकेत आमच्याकडे येत आहेत या सगळ्याचा अभ्यास केला, तर अनुमान असे काढता येऊ शकते की, राज्यात केव्हाही निवडणूक लागू शकेल, असे ते म्हणाले. अशा परिस्थितीत जेव्हा निवडणूक लागेल तेव्हा मावळमधला आमदार भाजपचाच असला पाहिजे, असे जाहीर आवाहन त्यांनी भाजप कार्यकर्त्यांना आणि पदाधिकाऱ्यांना केले आहे.

दरम्यान, शेलार यांनी पुण्याचे पालकमंत्री अजित पवार यांनाच अप्रत्यक्षपणे इशारा दिला आहे. जो मैं बोलता हूं वही करता हूं, और जो मैं नहीं बोलता, वो डेफिनेटली करता हूं. त्यामुळे माझ्या नादाला लागू नका, पालकमंत्र्यांनी आणि आमदारांनी हे लक्षात ठेवावे, असे आशिष शेलार या वेळी म्हणाले. काँग्रेस, राष्ट्रवादी आणि शिवसेनेचे वर्णन घोटाळेबाज, झोलबाज आणि दगाबाज असे होईल, असेदेखील आशिष शेलार म्हणाले.

मावळमध्ये शेतकऱ्यांवर झालेल्या गोळीबार प्रकरणीदेखील आशिष शेलार यांनी राज्य सरकारवर टीका केली आहे. मावळ शेतकरी गोळीबारात तीन शेतकरी मारले गेले. १८५ शेतकऱ्यांवर गुन्हे दाखल झाले. त्यांच्यावरील गुन्हे मागे घेण्याचे काम फडणवीस सरकारने केले आहे. ज्याने गोळ्या झाडल्या त्याला आज मुंबईमध्ये प्राईम पोस्टिंग दिली आहे. मावळमधील शेतकऱ्यांचे खरे शत्रू कोण हे आज पुन्हा एकदा सांगायचे आहे, अशा शब्दांत आशिष शेलार यांनी राज्य सरकारवर निशाणा साधला.

# पालक गमावलेल्या बालकांना आणि एकल महिलांना मिळणार अर्थसहाय्य

## कोविडच्या पार्श्वभूमीवर पनवेल मनपाचा निर्णय

**पनवेल : प्रतिनिधी**

पनवेल महापालिका क्षेत्रात कोविडमुळे एक किंवा दोन पालक गमावलेल्या बालकांना आर्थिक मदत देण्याचा निर्णय महापालिकेच्या महिला बालकल्याण समितीतर्फे घेण्यात आला आहे, तसेच कोरोना संसर्गामुळे ज्या महिलांच्या पतीचे निधन झाले आहे अशा एकल महिलांनाही अर्थसहाय्य देण्यात येणार आहे. महिला बालकल्याण समितीच्या शुक्रवारी (दि. १) झालेल्या ऑनलाइन बैठकीत याला मान्यता देण्यात आली.



महिला बालकल्याण समिती सभापती मोनिका महानवर यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या बैठकीस महिला बालकल्याण समितीच्या सदस्य नगरसेविका, तसेच अतिरिक्त आयुक्त तृप्ती सांडभोर, सहाय्यक आयुक्त वंदना गुळवे, अधिकारी कर्मचारी उपस्थित होते. या वेळी पती निधनानंतर एकल महिलांना 'विधवा' म्हणून संबोधले जाते. अशा शब्दातून त्यांचा अवमान व उपेक्षा केली जाते. म्हणून यापुढे विधवा असा शब्दप्रयोग न करता 'विवाहित एकल महिला' असे संबोधण्यात यावे, असा ठराव या वेळी करण्यात आला.

पनवेल महापालिकेच्या पाचव्या वर्धापन दिनाचे औचित्य साधून महिला बालकल्याण विभागाने दोन महत्त्वाच्या विषयास मान्यता दिली. पनवेल महापालिका कार्यक्षेत्रात कोविडमुळे एक किंवा दोन पालक गमावलेल्या बालकांना आर्थिक मदत मिळणार आहे. १२ मार्च २०२०नंतर कोविड संसर्गामुळे ज्या बालकांचे एक पालक मृत्यू पावले आहेत अशा बालकांना २५ हजार रुपये, तर दोन्ही पालक गमावलेल्या बालकांना ५० हजार रुपयांचे अर्थसहाय्य मिळणार आहे, तसेच कोरोनामुळे ज्या महिलांचे पती निधन पावले आहेत अशा 'एकल' महिलांना ५० हजार रुपयांचे अर्थसाह्य मिळणार आहे. यासाठी काही नियम व अटी लागू असणार आहेत.

कोविडमुळे मयत झालेल्या एक किंवा दोन्ही पालकांचा मृत्यूच्या वेळी कोविड तपासणी अहवाल पॉझिटिव्ह असणे गरजेचे आहे. कोविड १९मुळे उपचारादरम्यान मृत्यू झाला असल्याचे सक्षम अधिकाऱ्यांचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे. अहवाल पॉझिटिव्ह आल्यानंतर रुग्णालयातून उपचार घेऊन परतल्यानंतर पुनःश्च कोविड उपचाराकरिता रुग्णालयात दाखल असताना कोविड संसर्गामुळे मृत्यू झाला असल्यास त्यांनाही आर्थिक मदत मिळू शकते. म्युकरमायकोसिसमुळे मृत्यू झाला असल्यास त्यांच्या वारसांना आर्थिक मदत मिळू शकते.

यासाठी स्वतः मुले, त्यांचे संगोपन करणारे सध्याचे पालक किंवा संगोपन करणारी संस्था अर्ज करू शकेल. या अंतर्गत मिळणारे अर्थसहाय्य हे लाभार्थी बालकांच्या नावाने मुदत ठेवीच्या स्वरूपात असेल.

# आमदार महेश बालदींनी घेतली एमआयडीसी प्रशासनासोबत बैठक

## मतदारसंघातील विषयांसंदर्भात चर्चा

**मुंबई : रामप्रहर वृत्त**

उरण विधानसभा मतदारसंघातील विविध विषयांसंदर्भात आमदार महेश बालदी यांनी अंधेरी येथे एमआयडीसीच्या उपमुख्य कार्यकारी अधिकारी यांची भेट घेतली. या वेळी आमदार महेश बालदींनी त्यांच्या मतदारसंघातील नागरी समस्या सोडविण्यासंदर्भात एमआयडीसीच्या अधिकाऱ्यांना निवेदन दिले.



बालदी यांनी निवेदनात म्हटले की, माझ्या उरण विधानसभा मतदारसंघातील आपल्या विभागाशी संबंधित अनेक विषय प्रलंबित असून ते सोडवावेत. यामध्ये पनवेल तालुक्यातील गुळसुंदे ग्रामपंचायतीकरिता नवीन पाणी कनेक्शन अतिरिक्त पाताळगंगा औद्योगिक वसाहतीच्या चावणे पाणीपुरवठा लाइनवरून मिळावे. कसळखंड ग्रामपंचायतीला एमआयडीसीमार्फत पाणीपुरवठा होतो. हा पाणीपुरवठा सुरळीत होण्यासाठी पाइपचा व्यास वाढवून मिळावा. रसायनी विभागातील शेतकऱ्यांच्या जमिनी ३० वर्षांपूर्वी एमआयडीसीने अधिग्रहण केल्या आहेत, परंतु त्या भूखंडांवर कंपनी (कारखाने) बनविले गेले नाहीत. त्यामुळे येथील तरुणांना रोजगार उपलब्धतेबाबत चर्चा करावी. ग्रुप ग्रामपंचायत मोहोपाडा (वासांबे) येथील तळेगाव पानशील या गावांना एमआयडीसीमार्फत पाणीपुरवठा करावा. मोहोपाडा येथील खानेआंबिवली, आळीआंबिवली या गावांना एमआयडीसीमार्फत अपुरा पाणीपुरवठा होतो. हा पाणीपुरवठा सुरळीत होण्यासाठी पाइपचा व्यास वाढवून द्यावा.

एमआयडीसी अधिकाऱ्यांसोबत झालेल्या बैठकीला आमदार महेश बालदी यांच्यासोबत गुळसुंदे जिल्हा परिषद विभागीय अध्यक्ष अविनाश गाताडे, कसळखंडचे माजी प्रभारी सरपंच अनिल पाटील, मोहोपाड्याचे माजी सरपंच सचिन तांडेल, कसळखंडचे माजी उपसरपंच रोहित घरत, गुळसुंदेचे सरपंच हरेश बांडे, उपसरपंच शांताराम मालुसरे, सदस्य मनोज पवार, युवा कार्यकर्ते दत्ता गायकर, जयदत्त भोईर, केतन जाधव, लाडीवलीतील ज्येष्ठ कार्यकर्ते प्रभाकर कार्लेकर आदी उपस्थित होते.

एमआयडीसीच्या अधिकाऱ्यांनी या निवेदनातील विषयांवर आमदार महेश बालदी यांच्यासोबत सकारात्मक चर्चा केली. एमआयडीसीने गुळसुंदे ग्रामपंचायतीला नवीन कनेक्शन देणे मान्य केले, तसेच कसळखंडसाठी पाणीपुरवठा सुरळीत होण्यासाठी पाइपचा व्यास वाढवून देणार असल्याचे मान्य केले. यामुळे ग्रुप ग्रामपंचायत कसळखंड हद्दीतील आष्टे, शिवाजीनगर, अरिवली, फणसवाडी या गावांना सुरळीत पाणीपुरवठा होण्यास मदत होईल.


**MAHATRANSCO** Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**Re-Tender notice**

MSETCL invites online bids (E-Tender) from registered contractors/agencies on Mahatransco E-Tendering website **https://srmetender.mahatransco.in** for following work

| Tender No.: EE/400kV/RS(O&M)/DN/KHR/Re-Ten-6/21-22 (RFX No. 7000019661) | Period for submission of E-Bid: 01.10.2021 to 08.10.2021 up to 23:59 hrs. |
|---|---|

**Name of Work: Supply and Erection of Buchholz relay and Gas collecting device for various units of ICTs and TFs at 400kV R.S., Kharghar**

| Estimated Cost | EMD (Rs.) | Tender Fee (Rs.) | Closing Date | Technical opening date | Commercial opening date |
|---|---|---|---|---|---|
| Rs. 4,97,647.42/- (Including GST) | Rs. 5000/- | Rs. 525/- (Including GST) | **08.10.2021** up to 23:59 hrs. | **11.10.2021** at 10:00 hrs. (If possible) | **11.10.2021** at 10:15 hrs. (If possible) |

**Contact Persons :**
1) Mr. V. K. Surpatne, Executive Engineer, 400kV RS O&M Dn., Kharghar, 9769213878
2) Ms. P. C. Deshpande, Dy.EE (O), 400kV RS O&M Dn., Kharghar, 9819313988
For further details visit our website **www.mahatransco.in**
1] Tender documents can be downloaded by only online from aforesaid website.
2] Eligible contractor should submit their bid well in advance instead of waiting till last date.
MSETCL will not be responsible for non-submission of Bid due to any website related problems.
**Note :- All eligible interested contractors are mandated to get enrolled on SRM E-Tender portal (New) - https://srmetender.mahatransco.in.**

**Amendment**
The Technical Specifications of this 'Re-Tender' have been changed over the original tender. The bidder should note the same as given in the 'Schedule (Revised) for Re-Tender' attached in the RFX and quote accordingly.

**SD/-**
**Executive Engineer,**
**400kV R.S. (O&M) Dn., Kharghar**






**पनवेल : रायगड जिल्हा परिषदेच्या गव्हाण-कोपर येथील शाळेत शासकीय मोफत पाठ्यपुस्तके व शालेय पोषण आहार वाटपाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता, तसेच या वेळी गव्हाण ग्रामपंचायतीच्या वतीने देण्यात आलेल्या वॉटर कुलरचे उद्घाटन पंचायत समिती सदस्य रत्नप्रभा घरत यांच्या हस्ते करण्यात आले. या वेळी गव्हाण ग्रामपंचायतीच्या सरपंच माई भोईर, उपसरपंच विजय घरत, शाळेचे चेअरमन अनंताशेठ ठाकूर, ग्रामपंचायत सदस्य रोशन म्हात्रे, शाळा कमिटी सदस्य काशिनाथ पाटील आदी उपस्थित होते.**

# भाजप खारघर शिष्टमंडळाने घेतली पनवेल महापालिका आरोग्य अधिकाऱ्यांची भेट

**खारघर : रामप्रहर वृत्त**

भाजप खारघर तळोजा मंडलच्या पदाधिकाऱ्यांनी पनवेल महापालिकेच्या खारघर येथील नागरी आरोग्य केंद्रास भेट दिली. या वेळी येथील वैद्यकीय अधिकारी डॉ. अश्विनी देवगावकर यांच्याशी मलेरिया व विशेष करून डेंग्यूच्या रुग्णसंख्या आणि



औषधोपचाराविषयी चर्चा केली. भाजप खारघर तळोजा मंडलचे अध्यक्ष ब्रिजेश पटेल यांच्या नेतृत्वाखाली उपाध्यक्ष दिलीप जाधव, सरचिटणीस दीपक शिंदे, युवा मोर्चा सरचिटणीस अमर उपाध्याय, सुमित सहाय व नगरसेविका हर्षदा उपाध्याय आदींचे शिष्टमंडळ या बैठकीत उपस्थित होते.

पान १ वरून

# आजिवली येथे शासकीय दाखले वाटप शिबिराला उदंड प्रतिसाद



नागरिकांचा हा त्रास वाचविण्यासाठी आमदार प्रशांत ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली पनवेल महापालिकेचे सभागृह नेते परेश ठाकूर, भाजपचे जिल्हा उपाध्यक्ष प्रल्हाद केणी, नगरसेवक हरेश केणी व नगरसेवक बबन मुकादम यांनी तहसीलदार विजय तळेकर यांची भेट घेऊन शासकीय दाखले वाटप शिबिर आयोजित करण्याची मागणी केली होती. त्या मागणीनुसार ग्रामीण व शहरी भागात सहा ठिकाणी शिबिरांचे आयोजन करण्यात आले आहे.

या अनुषंगाने खारघर, सुकापूर, कळंबोली व आजिवली येथे दाखले वाटप शिबिर झाले असून ८ ऑक्टोबरला सकाळी ११ वाजता कामोठे येथील सुषमा पाटील विद्यालयात, तर १२ ऑक्टोबर रोजी सकाळी ११ वाजता गव्हाण येथील छत्रपती शिवाजी हायस्कूलमध्ये शिबिर होणार आहे. या शिबिरात रेशन कार्ड, उत्पन्नाचा दाखला, डोमिसाईल, वय व अधिवास दाखला, रहिवासी दाखला, जातीचा दाखला, तसेच शालेय विद्यार्थ्यांसाठी आधारकार्ड नोंदणी व दुरुस्ती आदी सुविधा उपलब्ध होणार आहेत.


## जाहीर नोटीस

तमाम लोकांस कळविण्यात येते की, आमचे अशिल **मे. विला सिटी बिल्डर्स एल एल पी. तर्फे भागीदार श्री. करण सुधीर भट्ट** यांनी भुखंडधारक **(१) श्री. समाधान गणेश साखरे हे मयत कै. शकुंतला गणेश साखरे यांचे वारस व उत्तराधिकारी, (२) सौ. हेमलता वसंत सोनटक्के, (३) सौ. सुनिता अशोक पातकर, (४) श्री. राकेश गजानन जगे, आणि (५) सौ. निता रोशन पातकर,** यांच्याकडून त्यांच्या लाभांत वाटप करण्यात आलेल्या भुखंडाचे सिडकोची पूर्व परवानगी घेऊन हस्तांतरित करुन घेण्याचे ठरविले आहे. सदरच्या भूखंडाचे वर्णन खालीलप्रमाणे

**भुखंडाचे वर्णन**

| नोड, ता. आणि जि. | भुखंड क्र. | सेक्टर | क्षेत्रफळ चौ.मी. |
|---|---|---|---|
| द्रोणागिरी, ता. उरण, जि. रायगड | १२४ | ४८ | ९००.२७ चौ. मी. |

तरी या जाहीर नोटीशीने असे कळविण्यात येते की, वर उल्लेखित भुखंडाचे आमच्या अशिलांच्या लाभांत हस्तांतरण करुन घेण्याकरिता मे. सिडकोमार्फत संबंधित हस्तांतरण परवानगी मिळाल्यानंतर सदरहु भुखंडासंदर्भात आमचे अशिलांनी त्रिपक्षीय करारनामा करण्याचे ठरविले आहे, सदर भुखंडाचे हस्तांतरण करण्यापुर्वी, सदर भुखंड हा निर्वेध, बिनकर्जी, बोजारहित, निजोखमी व कुठल्याही प्रकारचा न्यायालयीन दावा प्रलंबित नाही असे असणे आवश्यक आहे, जर वरील नमुद केलेल्या भुखंडावर अन्यथा कोणाचा कोणत्याही प्रकाराचा हक्क, हितसंबंध, दावा असल्यास ही जाहीर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून **पंधरा (१५)** दिवसांचे आत खालील पत्त्यावर लेखी पुराव्यानिशी कळवावे. आणि जर तसे केले नाही तर असे गृहित धरण्यात येईल की, सदरचा भुखंड हा सर्व प्रकारच्या बंधनातून आणि अन्य हक्कांपासून आणि अधिकारांपासून मुक्त आहे आणि तसे जर काही हक्क असतीलच तर ते सोडून देण्यात आले आहेत असे मानण्यात येईल. परंतु दिलेल्या पंधरा (१५) दिवसांच्या मुदतीनंतर कोणतेही हक्क, हरकती आल्याच तर त्याचा विचार न करता आमचे अशील सदरहु भुखंडासंदर्भातील हस्तांतरण प्रकिया आणि व्यवहार पूर्ण करतील याची नोंद घ्यावी.

कळावे,
दिनांक : १/१०/२०२१

**सही/-**
**धनंदा प्रदिप मोकल-ठाकूर**
(वकील)

पत्ता : शॉप नं. १४, शिव चेंबर, प्लॉट नं. २१, सेक्टर-११, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई, ता. आणि जि. ठाणे. फोन नं. ९६१९५०५९५८






## पनवेल भाजपतर्फे जनहितार्थ माहितीसाठी

**पनवेल महानगरपालिका हद्दीत**
**शनिवार, दि. २ ऑक्टोबर २०२१ रोजी होणारे**

# कोरोना प्रतिबंधक लसीकरण

**(सर्व केंद्रांवर ऑनलाइन व ऑफलाइन लसीकरण होईल)**

### कोविशिल्ड

**सर्व केंद्रांवर पहिला व दुसरा डोस**
**(वयोगट :** १८ वर्षांवरील सर्व नागरिकांसाठी)

- १. यूपीएचसी-१, गावदेवी पाडा, पनवेल
- २. यूपीएचसी-२, कोळेश्वर शाळा, कोळीवाडा, पनवेल
- ३. यूपीएचसी-३, बांठिया स्कूलजवळ, नवीन पनवेल
- ४. यूपीएचसी-४, गुरुद्वारासमोर, कळंबोली
- ५. यूपीएचसी-५, डी-मार्टच्या मागे, सेक्टर १५, खारघर
- ६. यूपीएचसी-६, सुषमा पाटील विद्यालय, कामोठे

*सहा नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रांवर (यूपीएचसी) परदेशी जाणाऱ्या नागरिकांसाठी दुसरा डोस उपलब्ध असेल.*

- ७. आरोग्य उपकेंद्र, कर्नाटक समाज हॉलजवळ, नवीन पनवेल, सेक्टर २
- ८. आरोग्य उपकेंद्र मनुस्मृती रोटरी क्लब, सेक्टर ३०, ओवे गाव, खारघर
- ९. आरोग्य उपकेंद्र ६, रामशेठ ठाकूर इंग्लिश मीडियम स्कूल, कामोठे
- १०. नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ पब्लिक हेल्थ ट्रेनिंग अॅण्ड रिसर्च सेंटर, से. १८, खांदा कॉलनी
- ११. तळोजा शाळा, तळोजा गाव
- १२. टाटा अॅडव्हान्स सेंटर, खारघर
- १३. आरोग्य उपकेंद्र १, रोटरी कम्युनिटी सेंटर, सेंट जॉर्ज चर्चजवळ, नवीन पनवेल
- १४. आरोग्य उपकेंद्र, नावडे, कळंबोली (उपप्रभाग समिती कार्यालय, नावडे, जुना पुणे-मुंबई हायवे)
- १५. श्री गणेश विद्यामंदिर प्राथमिक शाळा नंबर ६, धाकटा खांदा
- १६. डॉ. आंबेडकर भवन, पनवेल ■ १७. सुधागड कॉलेज, कळंबोली
- १८. न्यू इंग्लिश स्कुल, कळंबोली ■ १९. दत्तूशेठ पाटील हायस्कूल, कामोठे

### कोव्हॅक्सिन

- १. आरोग्य उपकेंद्र काळभैरव मंगल कार्यालय, प्रभाग समिती ब कार्यालयाच्या बाजूला, कळंबोली
- २. पनवेल जिमखाना, ५२ बंगला, पनवेल ■ ३. नागरी आरोग्य केंद्र-५, खारघर

### पनवेल ग्रामीण लसीकरण

- कळंबोली, कातकारवाडी फुडलँड ■ चाळ, रा.जि.प. शाळा ■ सागवाडी
- बिड रा.जि.प. शाळा ■ सिद्धी करवले रा.जि.प. शाळा ■ हैदरवाडी मंदिर
- ओवे, रा.जि.प. शाळा ■ रोडपाली कातकरीवाडी मंदिर ■ चाफेवाडी ■ धानसर रा.जि.प. शाळा

**निर्देशित केलेल्या लसीकरण केंद्रांवर पहिल्या डोसकरिता २०० व दुसऱ्या डोसकरिता १०० डोस उपलब्ध असतील याची नागरिकांनी नोंद घ्यावी.**
**(वेळ सकाळी ११.०० ते ४.०० वाजेपर्यंत)**

## निवडक

### पनवेलमधून एक जण बेपत्ता



**पनवेल :** राहत्या घरातून कोणास काही एक न सांगता एक व्यक्ती कुठेतरी निघून गेल्याने तो हरविल्याची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे. करंजाडे वसाहतीमध्ये राहणारा रूपेश बाबासाहेब खाकाळ (वय ३६) रंग सावळा, उंची १६.५ सेमी, अंगाने मजबूत, केस काळे व बारीक, अंगात फिक्कट निळा शर्ट, काळी पॅन्ट घातलेली आहे तसेच पायात चप्पल आहे. या व्यक्तीबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास शहर पोलीस ठाणे दूरध्वनी (२७४५२३३३) किंवा पोलीस नाईक व्ही. बी. गावडे यांच्याशी संपर्क साधावा.

### उरण न्यायालयाचे विविध उपक्रम

**उरण :** भारताच्या स्वातंत्र्याचे ७५वे वर्ष असून यानिमित्त संपूर्ण भारतभर स्वातंत्र्य दिनाचा अमृतमहोत्सव हा उपक्रम सुरू असून त्याच अनुषंगाने उरण न्यायालयातर्फे संपूर्ण उरण तालुक्यात विविध उपक्रम राबविण्यात येणार आहेत. २ ऑक्टोबर ते १४ नोव्हेंबर २०२१पर्यंत हे उपक्रम सुरू राहणार आहेत. यामध्ये कायद्याबद्दल जनजागृती करण्यासाठी विविध उपक्रम व पथनाट्य होणार असल्याची माहिती क स्तर दिवाणी न्यायाधीश निलेश वाली, सहदिवाणी न्यायाधीश आर. बी. करडे, सहन्यायाधीश पी. ए. पाठाडे यांनी दिली. या उपक्रमांचा लाभ घ्यावा, असे आवाहनही त्यांनी केले आहे.

### वाहनाच्या धडकेने दुचाकीस्वाराचा मृत्यू

**पनवेल :** अज्ञात वाहनाच्या धडकेने एका स्कुटीचालकाचा मृत्यू झाला आहे. ही घटना पनवेलजवळील चिरनेर-गव्हाण रोडवर स्कोप वेअर हाऊस साई सहारा हॉटेलच्या बाजूला गव्हाण फाटा येथे घडली. पुरुषोत्तम कुशवाहा (वय ३७) हे त्यांच्या स्कुटीवर घरी येत असताना अज्ञात वाहनाच्या चालकाने त्यांच्या गाडीस ठोकर दिली. या अपघातात कुशवाहा हे गंभीर जखमी होऊन मृत्यू पावले. या घटनेनंतर अज्ञात वाहनचालक पसार झाला. या अपघाताची नोंद शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

### प्राप्ती गावंड यांना पुरस्कार



**उरण :** विजय श्रीधर कामेरकर पुरस्कृत कै. सौ. सुरेखा श्रीधर कामेरकर आदर्श शिक्षक पुरस्कार जनरल एज्युकेशन इन्स्टिट्यूट संस्थेच्या पूर्व प्राथमिक विभागातून कै. गो. ना. अक्षीकर विद्या संकुलातील पूर्व प्राथमिक शाळेच्या सहाय्यक शिक्षिका प्राप्ती प्रभाकर गावंड यांना आदर्श शिक्षक पुरस्कार देण्यात आला. आद्य संस्थापक कै. गोपाळ अक्षीकर यांच्या १५७व्या जयंतीनिमित्त एनआय हायस्कूलचे अध्यक्ष सदानंद गायकवाड यांच्या हस्ते पुरस्कार प्रदान करण्यात आला. या कार्यक्रमाला सामाजिक कार्यकर्ते संतोष पवार, मोहन जगताप, लायन्स क्लबचे अध्यक्ष नरेंद्र ठाकूर, मुख्याध्यापक श्री. कोठावदे, मुख्याध्यापिका नीलिमा नारखेडे, ज्योती पाटील, सानिका फराड आदी उपस्थित होते.

# शिवसेना शाखाप्रमुख, रिक्षा संघटना अध्यक्ष भाजपत

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भारतीय जनता पक्षाचे सक्षम नेतृत्व आणि विकासकामांवर विश्वास ठेवून विविध पक्षातील पदाधिकारी तसेच विविध संघटनांचे पदाधिकारी भाजपमध्ये जाहीर प्रवेश करीत आहे. त्या अंतर्गत भाजप युवा मोर्चा रायगड जिल्हाध्यक्ष मयुरेश नेतकर यांच्या नेतृत्वाखाली शिवसेना शाखाप्रमुख सोमनाथ पवार यांनी त्यांच्या सहकाऱ्यांसह तसेच महाराष्ट्र रिक्षाचालक संघटनेचे पनवेल तालुका अध्यक्ष सुनील कुंदन यांनी नाकाप्रमुख आणि रिक्षाचालकांसह शुक्रवारी






(दि. १) भारतीय जनता पक्षाचा झेंडा हाती घेतला. सर्व प्रवेशकर्त्यांचे भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांनी भाजपची शाल देऊन पक्षात स्वागत केले.

भारतीय जनता पक्षात प्रवेश करणाऱ्यांचा ओघ कायम आहे. भाजपच्या मार्फत सुरू असलेल्या विकासकामांवर प्रभावित होऊन विविध पक्षातील पदाधिकारी भाजपमध्ये दाखल होत आहे. त्या अंतर्गत शिवसेनेचे शाखाप्रमुख सोमनाथ पवार, नितीन पवार, संतोष पोकळे, संतोष हरिअर, मिलिंद ठाकूर, शिवाजी झांजे, दीपक कुंभार, संतोष शेरिकर, जयेश पवार, सशदाब शेख, इमरान पावले, महेश शेरिकर, विकी शेरिकर, सोनल हितेश तसेच महाराष्ट्र रिक्षा चालक-मालक संघटनेचे पनवेल तालुका अध्यक्ष सुनील कुंदन, विकी पवार, कृष्णा पाटील, रवी निमकर, सज्जत फक्की, प्रदिप कदम, किशोर जोशी, माजिद बागवान, जमिर शेख, विजय साचे, सुरेश शिंदे, मोहन कचरे, संदीप टाक, फरमान राशिद मुल्ला मुतिन खान यांनी भारतीय जनता पक्षात जाहीर प्रवेश केला.

सीकेटी महाविद्यालयात हा पक्षप्रवेश झाला. या कार्यक्रमास नगरसेवक मनोहर म्हात्रे, मुकीद काझी, युवा मोर्चा उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष मयुरेश नेतकर, चिन्मय समेळ, जवाद काझी यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते. या सर्व प्रवेशकर्त्यांचे पनवेल महापालिकेचे सभागृह नेते परेश ठाकूर यांनी अभिनंदन करीत त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

## सिडकोकडून प्रकल्पबाधितांच्या संस्थांना विक्रीसाठी भूखंड उपलब्ध




**नवी मुंबई : सिडको वृत्तसेवा**

सिडको महामंडळाकडून नवी मुंबई प्रकल्पबाधितांच्या नोंदणीकृत संस्थांस महिला मंडळाकरिता नवी मुंबईतील चार भूखंड विक्रीकरिता उपलब्ध करून देण्यात आले आहेत. या योजनेतील एकूण चार भूखंडांपैकी दोन भूखंड हे नेरूळ नोडमध्ये तर उर्वरित दोन भूखंड हे अनुक्रमे उलवे आणि एक भूखंड द्रोणागिरी नोडमध्ये उपलब्ध आहे.

सिडको महामंडळाकडून, नवी मुंबईच्या सर्वांगीण विकासाकरिता सातत्याने विकास प्रकल्पांबरोबरच सामाजिक उद्देशांकरिताही भूखंड भाडेपट्ट्याने उपलब्ध करून देण्यात येतात. या योजनेंतर्गत सेक्टर-२३ (दारावे), नेरूळ, सेक्टर-६ (सारसोळे), नेरूळ, सेक्टर-२, उलवे आणि सेक्टर-५२, द्रोणागिरी नोडमधील प्रत्येकी एक याप्रमाणे एकूण चार भूखंड हे नवी मुंबई प्रकल्पबाधितांच्या नोंदणीकृत संस्थांना महिला मंडळांकरिता उपलब्ध करून देण्यात आले आहेत. हे भूखंड ७२.३८ चौमी ते १९९.६१ चौमीदरम्यानच्या क्षेत्रफळाचे आहेत.

योजनेच्या योजना पुस्तिका २० सप्टेंबर ते १४ ऑक्टोबर २०२१ या कालावधीत कार्यालयीन कामकाजांच्या वेळेत व दिवशी सिडकोच्या रेल्वे स्थानक वाणिज्यिक संकुल, टॉवर क्र. ७मधील व्यवस्थापक (पुनर्वसन) यांच्या कार्यालयात विक्रीकरिता उपलब्ध आहेत.

**नवी मुंबई प्रकल्पबाधितांच्या सर्वांगीण विकासास सिडकोने नेहमीच प्राधान्य दिले आहे. या योजनेंतर्गत महिला मंडळांकरिता भूखंड उपलब्ध करून देण्यात आले आहेत. महिला मंडळांकडून चालविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांद्वारे प्रकल्पबाधित महिलांच्या सक्षमीकरणास मोठ्या प्रमाणावर हातभार लागणार आहे.**

**-डॉ. संजय मुखर्जी, एमडी, सिडको**

## सिडकोकडील सेवा पनवेल मनपाकडे हस्तांतरित करण्याच्या कामाला वेग

**पनवेल : प्रतिनिधी**



सिडकोकडील सेवा पनवेल महापालिकेकडे हस्तांतरणाच्या दृष्टीने सिडको अधिकाऱ्यांबरोबर सेवा पाहणी महापालिका अधिकाऱ्यांनी सुरू केली आहे. गुरुवारी (दि. ३०) झालेल्या विभाग प्रमुखांच्या बैठकीत आयुक्त गणेश देशमुख यांनी संबधित विभागाकडून या पाहणीचा आढावा घेतला.

पनवेल महापालिका हद्दीत सिडको प्राधिकरणाच्या हस्तांतरण होणाऱ्या सेवा-सुविधा पाहणी कार्यक्रम हाती २७ सप्टेंबरपासून घेतला आहे. यामध्ये रस्ते, फूटपाथ, मलनिस्सारण वाहिनी, एसटीपी प्लॅन्ट, इलेक्ट्रिकल व एचटी कनेक्शन्स, पथदिवे, उद्याने, खेळाची मैदाने, ट्री बेल्ट, होल्डिंग पॉन्ड्स, स्मशानभूमी, रोज बाजार, अग्निशमन या सेवा महापालिकेकडे हस्तांतरित करण्याबाबत चर्चा झाली.

स्वामी नित्यानंद रस्त्याचे रूंदीकरण, शाळा हस्तांतरण, लसीकरण मोहीम, पालिका हद्दीतील अतिक्रमण, प्रस्तावित नवीन नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र, प्रस्तावित वॉर्ड ऑफिस बांधकाम या विषयांचा आयुक्तांनी आढावा घेतला.

असंघटित कामगारांची विकास आयुक्तांकडून सिटीझन सर्व्हिस सेंटरच्या माध्यमातून नोंदणी केली जाणार आहे. यासाठी शासनाने ई-श्रम पोर्टल सुरू केले आहे. पालिकेने असंघटित कामगारांची नोंदणी करण्यासाठी याचा प्रचार व प्रसार करण्यासाठी मदत करावी या उद्देशाने सिटीझन सर्व्हिस सेंटरचे कोऑर्डिनेटर प्रदीप पवार यांनी या विषयाची माहिती उपस्थित विभागप्रमुखांना दिली.

पनवेल महापालिका क्षेत्रातील कर्मचारी निधी, भविष्यनिर्वाह निधी, आयकर न भरणारे, १६ ते ५९ वयोगटातील कामगार यामध्ये नोंदणी करू शकतात. रायगडातील लघुउद्योग, गृहोद्योग, मच्छीमार, वीटभट्टी कामगार, रिक्षाचालक, फेरीवाले, टेम्पो ड्रायव्हर या अंतर्गत नोंदणी करू शकतात. नोंदणी करण्यासाठी कामगाराचे आधार कार्ड व बँकेचे पासबुक असणे आवश्यक आहे, अशी माहिती पवार यांनी दिली. असंघटित कामगारांची नोंदणी करण्यासाठी सेंटरला प्रभाग अधिकाऱ्यांनी मदत करण्याचे आदेश बैठकीत आयुक्तांनी दिले.

## वाहतूक कोंडी उपाययोजनांचा आढावा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल शहरात भेडसवणारी वाहतूक कोंडीची समस्या सोडविण्यासंदर्भात आमदार प्रशांत ठाकूर यांनी पुढाकार घेतला असून त्यांच्या उपस्थितीत पोलीस अधिकारी, महापालिकेचे अधिकारी, नगरसेवक आणि लोकप्रतिनिधी यांची नुकतीच बैठक झाली होती. त्यानुसार वाहतूक कोंडीला आळा घालण्यासंदर्भात पोलिसांमार्फत उपाययोजना करण्यात आल्या आहे. याबाबत आढावा घेण्यासाठी महापौर डॉ. कविता चौतमोल, सभागृह नेते परेश ठाकूर आणि आयुक्त गणेश देशमुख यांच्या




उपस्थितीत गुरुवारी (दि. ३०) महापालिकेत बैठक झाली.

पनवेल शहर वाहतूक कोंडीतून मुक्तता करण्याबाबत या वेळी सकारात्मक चर्चा करण्यात आली. वाहतूक कोंडीसंदर्भात करण्यात येणाऱ्या उपाययोजनांचा आढावा घेण्यासाठी झालेल्या बैठकीस महापौर डॉ. कविता चौतमोल, सभागृह नेते परेश ठाकूर, आयुक्त गणेश देशमुख यांच्यासह प्रभाग समिती 'क' सभापती हेमलता म्हात्रे, नगरसेवक अनिल भगत, मनोहर म्हात्रे, नितीन पाटील, ॲड. मनोज भुजबळ, विक्रांत पाटील, नगरसेविका चारुशीला घरत, दर्शना भोईर, रूचिता लोंढे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक लांडगे, वाहतूक शाखेचे प्रभारी निरीक्षक श्री. नाळे, उमेश इनामदार यांच्यासह पदाधिकारी उपस्थित होते.

आमदार प्रशांत ठाकूर, महापौर डॉ. कविता चौतमोल, पोलीस आणि ट्रॅफिक पोलीस अधिकारी यांच्यामार्फत करण्यात येत असलेल्या उपाययोजनांमुळे पनवेल शहर वाहतूक कोंडीला आळा बसणार असून पनवेल शहर लवकरच वाहतूक कोंडीतून मुक्त होणार आहे.

## शिक्षण विभागामार्फत गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रायगड जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागामार्फत गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात येत आहे. त्या अंतर्गत पनवेल पंचायत समितीत परीक्षांमध्ये गुणगौरव प्राप्त केलेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार शुक्रवारी (दि. १) करण्यात आला. या सत्कार सोहळ्याला पंचायत समिती सदस्य रत्नप्रभा घरत उपस्थित होत्या.



रायगड जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागामार्फत आदर्श शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात येत आहे. त्या अंतर्गत दहावीत चांगू काना ठाकूर (सीकेटी) विद्यालयाच्या प्रचिती नामदेव गायकर व अर्पिता भरत जितेकर आणि बारावीत केपीसी हायस्कूलचे साहिल संजय वेदपाठक व सीकेटी विद्यालयाची ऋतुजा विकास गुजरे यांनी उत्कृष्ट कामगिरी करीत नावलौकिक मिळवला आहे. त्यानिमित्त त्यांचा मान्यवरांच्या हस्ते सन्माचिन्ह देऊन गौरव करण्यात आला.

या सत्कार समारंभाला पंचायत समिती सदस्य काशिनाथ पाटील, वसंत काठवले, गटविकास अधिकारी संजय भोये, गटशिक्षण अधिकारी महेश खामकर, सीकेटी विद्यालयाच्या प्राचार्य इंदुमती घरत, केपीसी हायस्कूलच्या डॉ. छाया, विस्तार अधिकारी बबन म्हात्रे, केंद्र प्रमुख बा. ना. म्हात्रे, विनोद ठाकूर, संदीप भोईर, अभिजित मटकर, चेतन गायकवाड आदी उपस्थित होते.

# विकासाच्या नव्या महामार्गावर पनवेल

## पाच वर्षांत महापालिकेने नागरिकांसाठी राबविल्या अनेक योजना

**पनवेल : प्रतिनिधी**

पनवेल महापालिकेच्या स्थापनेला शुक्रवारी (दि. १) पाच वर्षे पूर्ण झाली असून या आमदार प्रशांत ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली पाच वर्षांत महापालिका क्षेत्राच्या नागरी सुविधांमध्ये वाढ करण्याबरोबरच अनेक योजना कार्यान्वित झाल्या आहेत. एका लहान शहरापासून महानगर होण्याचा प्रवास सुरू झाला असून महापौर डॉ. कविता चौतमोल, सभागृह नेते परेश ठाकूर, आयुक्त गणेश देशमुख यांच्या नेतृत्वाखाली प्रशासनाने नागरिकांच्या सोयी-सुविधांसोबत शहराच्या सुशोभीकरण आणि स्वच्छतेवर विशेष लक्ष दिले आहे. कोविडविरोधी लढाईत महापालिकेने संवेदनशीलतेने आणि तत्परतेने निर्णय घेऊन योजना राबविल्याने कोविड नियंत्रणात ठेवण्यात यश आले आहे.

मुंबईचे महाद्वार असलेल्या पनवेल क्षेत्राच्या विकासासाठी विविध योजना राबविल्या जातात. शहराच्या रस्ते, पाणी, स्वच्छता या मूलभूत सुविधांसोबतच सुशोभीकरणावर विशेष भर दिला आहे. २४ कोटी रुपये खर्चून अमृत कार्यक्रमांतर्गत वाढीव पनवेल पाणीपुरवठा योजना पूर्ण झाली असून एक कोटी आठ लाख खर्चून मौजे कोपरा खारघर पाणीपुरवठा योजना कार्यान्वित झाली आहे. महापालिका क्षेत्रातील गावात १३.८० लाख रुपये खर्चून आरओ प्लान्ट बसविले असून १९.७१ लाख खर्चून कुपनलिकांवर नॉन इलेक्ट्रीक वॉटर डिसइन्फेक्शन युनिट बसविले आहेत. वैद्यकीय सुविधा अधिक सक्षम करण्यावर महापालिकेचा भर असून सद्याच्या नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये अधिक नऊची वाढ प्रस्तावित आहे. त्यासोबतच १०० खाटांचे माता बाल आरोग्य केंद्र प्रस्तावित करण्यात आले आहे.

कोविडच्या संभाव्य तिसऱ्या लाटेच्या पार्श्वभूमीवर सिडकोच्या माध्यमातून ६३५ खाटांचे सुसज्ज कोविड रुग्णालय उभारण्यात आले आहे. पालिका क्षेत्रात ३३ कोविड लसीकरण केंद्र असून आजवर सात लाख २९ हजार १३३ नागरिकांनी लसीकरणाचा लाभ घेतला आहे. स्वच्छ भारत अभियानांतर्गत घनकचरा, रस्ते, शौचालय साफसफाई, मलनिस्सारण वाहिन्यांची साफसफाई, सार्वजनिक सेप्टीक टाकी स्वच्छ करणे, अशी दैनंदिन कामे सुरू असतात.

प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत २०२२पर्यंत १२ हजार ८४१ घरांचे उद्दिष्ट पालिकेने ठेवले असून त्या दृष्टीने महापालिकेने आपल्या प्रकल्पाच्या अमंलबजावणीसाठी तांत्रिक मान्यता व निविदा प्रक्रिया सुरू केले आहे. पनवेल महानगरपालिका क्षेत्रासाठी सुधारित व एकत्रित विकास योजना बनविण्याचे काम सुरू आहे.

पनवेल शहर हे मुंबईस जाण्याचे प्रवेशद्वार असल्याने व प्रस्तावित नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळामुळे भविष्यात वाढणारी वाहतूक व लोकसंख्येचा विचार करून ११ गावांमध्ये २४.०० मी. ते ३५.०० मी. रूंदीचे रस्ते प्रस्तावित केले असून, मंजूर विकास योजनेतील रस्त्यांच्या विकासा करीता भूसंपादनाचे काम सुरू आहे. तसेच पनवेल शहर येथील सहा रस्ते ९.१५ मी. ते १५.०० मी. रस्ता रूंद करण्याचे काम प्रगतिपथावर आहे. त्याचप्रमाणे शासकीय जमिनी हस्तांतरणाचे काम अंतिम टप्प्यात आहे.



**कामोठे : पनवेल महापालिकेच्या माध्यमातून प्ले ग्राऊंडे, उद्याने विकसित करून त्यामध्ये इनडोअर आणि आऊटडोअर खेळांसाठी तसेच ज्येष्ठ नागरिकांना आणि लहान मुलांसाठी अद्यायावत सुविधा उपलब्ध करुन सुशोभीकरण करण्यात येणार आहे. पार्श्वभूमीवर पनवेल महापालिकेचे सभागृह नेते परेश ठाकूर यांनी गुरुवारी सेक्टर २१ येथील उद्यानाची पाहणी केली. या वेळी भाजपचे शहर अध्यक्ष रवी जोशी, नगरसेवक विजय चिपळेकर, गोपीनाथ भगत, नगरसेविका संतोषी तुपे, पुष्पा कुत्तरवडे, अरुणा भगत, सामाजिक कार्यकर्ते प्रदीप भगत उपस्थित होते.**



**कामोठे : सेक्टर ६ आणि जवाहर इंडस्ट्रियल एरियालगत गणपती विसर्जन तलाव आहे, मात्र इंडस्ट्रियल कंपन्यांचे पाणी या तलावात सोडल्याने येथील पाणी दूषित झाले आहे. परिणामी परिसरात दुर्गंधी पसरली असून याचा त्रास नागरिकांना होत आहे. या संदर्भात पनवेल महापालिका सभागृह नेते परेश ठाकूर यांनी गुरुवारी या तलावाची पाहणी करून ते समस्येसंदर्भात सिडको अधिकाऱ्यांसोबत चर्चा करणार आहेत. या वेळी भाजपचे शहर अध्यक्ष रवी जोशी, नगरसेवक विजय चिपळेकर, गोपीनाथ भगत, नगरसेविका संतोषी तुपे, पुष्पा कुत्तरवडे, अरुणा भगत, सामाजिक कार्यकर्ते प्रदीप भगत उपस्थित होते.**


### जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीशीने कळविण्यात येत आहे की, आमचे अशिल खालील परिशिष्टात वर्णन केलेली मिळकत **श्रीमती मथुरा पदाजी पाटील, ताई मारुती केदारी, श्री. विष्णु काशिनाथ ठाकूर, श्री. कृष्णा काशिनाथ ठाकूर, श्री. अनंत शंकर पाटील, सौ. सुजाता गणपत भगत, सौ. महानंदा हरी म्हसकर, श्रीमती गोदावरी पांडूरंग पाटील, श्री. जयू पांडूरंग पाटील, श्री. आकाश जगन्नाथ पाटील, सौ. रुपाली सतिश म्हात्रे, सौ. प्रणाली अशोक नाईक** यांच्याकडून विकत घेण्याच्या विचारात आहेत. सदर मिळकतीच्या मालकी हक्काची खात्री करुन घेण्याकरीता सदर नोटीस प्रसिध्द करण्यात येत आहे.

**परिशिष्ट**

**मौजे-बेलोंडाखार, तालुका-उरण, जिल्हा-रायगड.**

| गट नं./हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु.पै. |
|---|---|---|
| ७/५ | ०-७०-२० पो.ख. ०-०५-१० एकूण ०-७५-३० | १०.३७ |

वरील वर्णन केलेली जमीन मिळकत अथवा तिच्या कोणत्याही एका भागावर यापुर्वी विक्री, देणगी, दान, मक्ता, वहिवाट, ताबा, देखभाल, गहाण, कुळ अथवा अन्य कोणताही हक्क असलेल्या सर्व संबंधितांनी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १४ दिवसांच्या आत आपल्या लेखी हरकती कागदोपत्रांसहीत व पुराव्यासहित खाली सही करणार यांचेकडे पोहोच कराव्या अथवा रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्या. वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत, तक्रार, दावा न आल्यास सदर मिळकत निर्वेध, बोजारहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचा व्यवहार पूर्ण करतील व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारच्या हरकती, तक्रारी, दावे आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत व त्या सोडून दिल्या आहेत असे गृहित धरुन सदरचा व्यवहार पूर्ण केला जाईल याची तत्सम लोकांनी कृपया नोंद घ्यावी.

पनवेल. **सही/-**

दि. ०१/१०/२०२१. **ॲड. प्रशांत अशोक भुजबळ**

कार्यालय : २, आशादिप अपार्टमेंट, वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहाजवळ अनिल झेरॉक्सच्या बाजूला, पनवेल दूरध्वनी क्र. : २७४५६३०६

## संपादकीय

# अमृतमय भारत

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशाची सूत्रे स्वीकारल्यानंतर भराभरा निर्णय घेत सर्वप्रथम देशभरात झाडझूड आणि स्वच्छता सुरू केली. मग तो भ्रष्टाचाराचा केरकचरा असो किंवा गावोगाव, गल्लोगल्ली साचलेला खराखुरा उकिरडा. हे पंतप्रधानांचे सर्वंकष असे स्वच्छता अभियान होते. महात्मा गांधी यांच्या स्वप्नातील भारत उभा करण्याचा पंतप्रधानांचा इरादा यात स्पष्टपणे दिसतो आणि समाधानाची बाब म्हणजे आता त्या दिशेने सारा देश वेगाने पावले टाकताना दिसत आहे.

**सुमारे आठ वर्षांपूर्वी भारतामध्ये अभूतपूर्व क्रांती घडली आणि अनेक दशके काँग्रेसच्या राजकारणामुळे वैतागलेल्या भारतीय जनतेने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या ताब्यात देशाची सूत्रे सुपूर्द केली. नव्या भारताचा खऱ्या अर्थाने उदय त्याचक्षणी झाला. या परिवर्तनाचे श्रेय भारतीय जनतेलाच जाते. पंतप्रधान मोदी यांच्या काही लाडक्या योजनांपैकी स्वच्छ भारत योजना आहे. स्वच्छ भारत आणि अटल योजना या दोन योजनांच्या साथीने पंतप्रधानांनी देशाच्या कायापालटास प्रारंभ केला असे म्हटल्यास वावगे ठरू नये. आठ वर्षांनंतर शुक्रवारी पंतप्रधानांनी स्वच्छ भारत योजना शहर हे योजनेचे पुढचे पाऊल जाहीर केले. त्याचबरोबर अटल योजनेचा पुढला टप्पा सुरू होत असल्याची घोषणा देखील केली. स्वच्छ भारत योजनेस देशभरातून अभूतपूर्व प्रतिसाद मिळाला. अनेक गावे कात टाकल्यासारखी स्वच्छ दिसू लागली. लोकांच्या सवयी बदलल्या. ग्रामीण भागामध्ये तब्बल १० कोटींहून अधिक स्वच्छतागृहे उभी राहिली. हजारो गावे हगणदारीमुक्त झाली. याच योजनेचा पुढला टप्पा आता सुरू होत आहे. शहरी भागांतील स्वच्छता या टप्प्यामध्ये प्राधान्यक्रमाने विचारात घेतली जाणार आहे. लोकसंख्येच्या प्रस्फोटामुळे शहर-गावांतील व्यवस्थांवर कमालीचा ताण पडतो. शहरे विद्रुप आणि बकाल होत जातात. यास मुंबई-पुण्यासारखी मोठी शहरे देखील अपवाद नाहीत. ही सर्व शहरे कचरामुक्त करण्याचा संकल्प स्वच्छ भारत योजनेच्या दुसऱ्या टप्प्यात करण्यात आला आहे. अटल शहरी पुनरुज्जीवन आणि परिवर्तन मिशन हीदेखील पंतप्रधान मोदी यांची आवडती आणि यशस्वी योजना आहे. जून २०१५ मध्ये अटल योजनेची मुहुर्तमेढ रचण्यात आली आणि त्यायोगे पुरेसे, मजबूत सांडपाणी वाहून नेणारे जाळे आणि पाणीपुरवठा सुनिश्चित करण्यासाठी पायाभूत सुविधा निर्माण करण्यावर भर देण्यात आला. सांडपाणी आणि मैला व्यवस्थापनात वाढ करणे, आपल्या शहरांना जलसुरक्षित करणे आणि मुख्यत: आपल्या शहरांनजीकच्या नद्यांमध्ये कुठेही नाल्याचे दूषित पाणी मिसळणार नाही हे सुनिश्चित करणे हेच अमृत योजनेचे लक्ष्य आहे असे पंतप्रधानांनी स्पष्ट केले आहे. या सर्वच गोष्टी आधुनिक भारताच्या उभारणीसाठी किती आवश्यक आहेत हे वेगळे सांगायला नको. या दोन्ही योजनांचे दुसरे पर्व निश्चितच यशाची नवी उंची गाठेल यात शंका नाही. कारण या दोन्ही योजनांवर पंतप्रधानांचे वैयक्तिक लक्ष असणार आहे. नागरिक म्हणून आपण देखील या योजनांना सक्रिय पाठबळ द्यायला हवे. आताशा लोकांच्या सवयी बदलत चालल्या आहेत. प्लास्टिकच्या पिशव्यांचा घातक वापर अंशत: का होईना कमी झाला आहे. तरुण पिढीदेखील चॉकलेटची वेष्टणे निमूटपणे खिशात टाकू लागली आहे. कचरा इतस्तत: टाकण्याचे प्रमाण घटताना दिसत आहे. स्वच्छ भारत अभियान आणि अमृत मिशन या दोन्ही योजनांच्या दुसऱ्या पर्वासाठी देशाची जनता कटिबद्ध राहील अशी अपेक्षा आहे.**

# पाणीदार ग्रामपंचायत - जामरूंग



खबरबात
संतोष पेरणे

कर्जत तालुक्यातील टेंबरे ग्रामपंचायतीचे विभाजन होऊन बनलेल्या जामरूंग ग्रामपंचायतीने आपल्या हद्दीतील पाण्याच्या स्त्रोतांचे जतन करण्याचा निर्णय घेतला आणि ग्रामपंचायत पाणीदार बनवली आहे. ग्रामपंचायतीमधील सर्व भागात पाणी साठवण करण्याचे यशस्वी नियोजन करून, तसेच सिमेंट बंधारे आणि साठवण बंधारे यांची निर्मिती करून जलसाक्षरता मोहीम राबविण्याचे यशस्वी काम जामरूंगसारख्या नव्याने अस्तित्वात आलेल्या ग्रामपंचायतीने केले आहे.

कर्जत तालुक्यातील टेंभरे या लोकसंख्या आणि आकारमानाच्या दृष्टीने मोठ्या असलेल्या ग्रामपंचायतीचे २०१८मध्ये विभाजन करण्यात आले. त्यातून जामरूंग ही नवीन ग्रामपंचायत तयार झाली आणि प्रसिद्ध सोलनपाडा धरण, ऐतिहासिक पेठ किल्ला असलेले पेठ गाव, तसेच कामतपाडा, ठोंबरेवाडी आणि अन्य गावांची मिळून तयार झालेल्या जामरूंग ग्रामपंचायतीला अनुभवी सरपंच थेट जनतेतून मिळाले. तालुक्यातील ज्येष्ठ कार्यकर्ते दत्तात्रय पिंपरकर यांनी जामरूंग या स्वतंत्र ग्रामपंचायतीची सूत्रे हातात घेतली आणि अनेक वर्षे विकासाच्या वाटेपासून दूर असलेल्या आपल्या भागातील गावांचा नियोजनबद्ध विकास व्हावा, असा प्रयत्न सुरू केला. उपसरपंच रोहिणी घुडे, ग्रामपंचायत सदस्य अरुण मेदगे, संदेश सावंत, शिवाजी बिबवे, अश्विनी पिंपरकर, सुनिता मेदगे, वेदिका सावंत, छगन गावंडा, रेखा शेंडे, फसाबाई ठोंबरे, तसेच प्रकाश चव्हाण, भगवान बांगर, पोलीस पाटील ज्योत्स्ना मेदगे यांचे सहकार्य गावाच्या विकासासाठी महत्त्वाचे ठरत आहे. या सर्व मंडळींनी राजकीय चपला बाजूला काढत विकासापासून मागे राहिलेल्या भागांचा विकास साधता यावा यासाठी काम सुरू केले.


जामरूंग ग्रामपंचायतीच्या पहिल्या सदस्य मंडळाने सर्वांना मुबलक पाणी मिळावे, यासाठी नियोजन केले. सोलनपाडा येथील पाझर तलावातील पाण्याचा स्त्रोत वापरून कायमस्वरूपी नळपाणी योजनांना पाणी मिळेल याची व्यवस्था करून घेतली. गावागावात नळाला पाणी आल्याने ग्रामस्थांच्या चेहऱ्यावरील आनंद दिसू लागला.

मार्च महिना आला की पाझर तलावातील पाणी सोडण्यावर बंधने येत होती. त्यातून नळपाणी योजना कुचकामी ठरणार नाहीत, यासाठी पाझर तलावातील पाणीवाटपाचे नियोजन नक्की केले. रायगड जिल्हा परिषदेनेदेखील सरपंच पिंपरकर यांच्या पाझर तलावातील पाणीवाटपाला हो म्हणत पाण्याचे नियोजन ठरवून घेतले. घरोघरी पोहचणारे पाणी शुद्ध असावे, यासाठी ग्रामपंचायतीने जलकुंभांच्या खाली पाणी शुद्धीकरण संचदेखील बसवून घेतले आहेत.

सरपंच पिंपरकर यांनी आपली ग्रामपंचायत जलसाक्षर करण्यासाठी पुढचे पाऊल टाकले. त्यातून पाझर तलावातील पाणी ज्या मार्गाने चिल्हार नदीकडे जाते, त्या मार्गावरील सिमेंट बंधाऱ्यांतून होणारी पाणी गळती थांबविण्याचे काम हाती घेतले व हे बंधारे दुरुस्त केले. डुक्करपाडा, ठोंबरेवाडी भागातील डोंगरामधून वाहून जाणारे पाणी अडविण्यासाठी ग्रामपंचायतीने चार ठिकाणी नवीन सिमेंट बंधारे आणि पाणी साठवण बंधारे बांधले आहेत.

**रोजगाराला पाणी...**

ग्रामपंचायतीने या भागातील चिल्हार नदीत कोल्हापुरी पद्धतीचे बंधारे बांधले. त्यातील पाण्यावर येथील लोक रोपवाटिका यांची शेती करतात. हजारो रोपे तयार करण्याचे काम या भागातील शेतकरी करतात. त्यामुळे ग्रामपंचायतीचे सर्व भाग पाण्याचे दृष्टीने सुखी बनले आहेत.





# पेण-जावळी एसटी सेवा सुरू करा

**ग्रामस्थांची मागणी**

**पेण : प्रतिनिधी**

तालुक्याच्या जावळी भागातील एसटी बससेवा अद्यापही नियमित सुरू न झाल्यामुळे विद्यार्थ्यांसह नोकरदारांना त्रास सहन करावा लागत आहे.

या भागातील बहुतांश ग्रामस्थांना कंपनीत, तसेच महिलांना काम करण्यासाठी शहरात जावे लागत असते. एसटी सेवा बंद असल्याने खाजगी वाहनाने परवडत नाही. त्यामुळे त्यांनी पेण-जावळी एसटी सेवा नियमित सुरू करण्याची मागणी केली आहे.

कोरोनाच्या पार्श्वभूमीवर तालुक्याच्या जावळी भागातील एसटी बससेवा बंद करण्यात आली होती. आता कोरोनाचा प्रादूर्भाव कमी झाला आहे. त्यामुळे एसटी प्रशासनाने अनेक मार्गावर बस सुरू केल्या आहेत.

मात्र पेण तालुक्याच्या जावळी भागातील एसटी बससेवा अजूनही नियमित सुरू झालेली नाही. खाजगी वाहनांकडून मोठ्या प्रमाणात लूट होत असल्याचे नोकरदार, तसेच विद्यार्थ्यांकडून बोलले जात आहे.

नोकरदार व ग्रामस्थांना नियमित शहरात जावे लागते, तसेच क्लासेस, शाळा सुरू झाल्याने विद्यार्थ्यांना शहरात यावे लागते, मात्र एसटी बस सुरू नसल्याने त्यांची गैरसोय होत आहे. त्यामुळे जावळी भागातील बससेवा त्वरित सुरू करण्याची मागणी ग्रामस्थांकडून होत आहे.

> **जावळी भागातील लोकांची गैरसोय लक्षात घेता त्या भागातील गाड्यांच्या फेऱ्यांचे नियोजन करून त्या लवकरात लवकर सुरू करण्यात येतील.**
>
> **-अनघा बारटक्के, विभागीय नियंत्रक रायगड**

# सूक्ष्म अन्नप्रक्रिया उद्योग योजनेचा लाभ घ्यावा

## माणगाव तालुका कृषी अधिकाऱ्यांचे आवाहन

**माणगाव : प्रतिनिधी**

केंद्र शासन सहाय्यित प्रधानमंत्री सूक्ष्म अन्नप्रक्रिया उद्योग ही केंद्र पुरस्कृत योजना एक जिल्हा एक उत्पादन या आधारावर राबविली जात आहे. या योजनेंतर्गत स्थानिक उत्पादनांना प्रोत्साहन देण्यात येणार आहे. मत्स्य उत्पादक, कोळंबी संवर्धन करणारे शेतकरी व इतर अन्नप्रक्रिया करणाऱ्या उद्योजकांनी या योजनेचा जास्तीत जास्त लाभ घ्यावा, असे आवाहन माणगाव तालुका कृषी अधिकारी आर. डी. पवार यांनी केले आहे.

या योजनेचा मुख्य उद्देश सध्या कार्यरत असलेले व नवीन स्थापित होणाऱ्या उत्पादनांवर आधारित वैयक्तिक सूक्ष्म अन्नप्रक्रिया उद्योग, तसेच शेतकरी उत्पादक कंपनी गट, संस्था, स्वयंसहायता गट व सहकारी दूध उत्पादक संस्था यांची पत मर्यादा वाढवणे, उत्पादनाचे ब्रॅण्डिंग व विपणन अधिक बळकट करून त्यांना संघटित अशा पुरवठासाखळीशी जोडणे, सामायिक सेवा जसे की सामायिक प्रक्रिया, सुविधा साठवणूक, पॅकेजिंग, विपणन, तसेच उद्योग वाढीसाठीच्या सर्वंकष सेवांचा सूक्ष्म उद्योगांना अधिक लाभ मिळवून देणे. हा प्रकल्प अहवाल बनवणे, ऑनलाईन अर्ज करणे, बँकांशी पाठपुरावा करून विविध परवाने काढणे इत्यादीसाठी संसाधन व्यक्ती यांच्याकडून विनामूल्य मदत मिळणार आहे.

सूक्ष्म अन्नप्रक्रिया उद्योग योजनेंतर्गत रायगड जिल्ह्याची निवड सागरी उत्पादने या घटकासाठी करण्यात आली आहे. सागरी उत्पादनामध्ये मत्स्य उत्पादनावर आधारित प्रक्रिया उद्योग, माशांपासून लोणचे बनवणे, सुकवलेले मासे, डबाबंद मासे, खारवलेले मासे, शीतगृह उभारणे, वाहतूक व विक्री व्यवस्था इत्यादी व्यवसायांचा समावेश आहे. त्यासाठी अनुदान उपलब्ध आहे. तसेच राईस मिल, पोहा मिल, काजूप्रक्रिया, पापड उद्योग, मसाला कांडप, नाचणी प्रक्रिया, फळप्रक्रिया आदी अन्नप्रक्रिया उद्योग आणि इतर चालू असलेल्या गृहोद्योगांनाही अनुदान दिले जाणार आहे, वैयक्तित लाभार्थी, भागीदारी संस्था, बेरोजगार युवक, महिला, प्रगतशील शेतकरी या योजनेचा लाभ घेऊ शकतात. या योजनाचा लाभ घेण्यासाठी http://pmfme.mofpi.gov.in/mis या वेबसाईटवर नोंदणी करणे आवश्यक आहे. अधिक माहिती माणगाव तालुका कृषी अधिकारी कार्यालयाला संपर्क साधावा, असे आवाहन कृषी अधिकारी आर. डी. पवार यांनी केले आहे.



**महाड : नगरसेवक गोविंद ऊर्फ दादा राक्षे यांचे नुकतेच निधन झाले. विधान परिषदेचे विरोधी पक्षनेते प्रवीण दरेकर यांनी राक्षे कुटुंबीयांची भेट घेऊन सांत्वन केले. या वेळी जिल्हा सरचिटणीस बिपीन महामुणकर, वाहतूक सेलचे जिल्हाध्यक्ष नाना पोरे, तालुका सरचिटणीस महेश शिंदे, चंद्रजीत पालांडे, निलेश तळवटकर, तुषार महाजन, करंजखोलचे सरपंच अशोक पोटसुरे आदी उपस्थित होते. दरम्यान, करंजखोल येथे महामार्गावर भुयारी मार्ग मिळाल्यामुळे ग्रामस्थांनी दरेकरांचे आभार मानले, तसेच या ठिकाणी झेब्रा क्रॉसिंग करून मिळावी अशी मागणी केली.**



**पोलादपूर : भाजप तालुका अध्यक्ष प्रसन्ना पालांडे यांचे वडील डी. बी. पालांडे यांचे नुकतेच निधन झाले. याबद्दल पालांडे कुटुंबीयांचे विरोधी पक्षनेते प्रवीण दरेकर यांनी सांत्वन केले. या वेळी जिल्हा सरचिटणीस बिपीन महामुणकर, माजी उपनगराध्यक्ष संदीप ठोंबरे, अध्यक्ष जयवंत दळवी, निलेश तळवटकर, विवेक पोटफोड, मनोज भागवत, अनिल नलावडे, महेश निकम, मंगेश शिंदे, परशुराम दरेकर, प्रभाकर पालांडे, राजन ऊर्फ बच्चू पवार, दीपक सुर्वे आदी उपस्थित होते.**

# रोहा चणेरा येथे कृषी मेळावा

**(छाया : महादेव सरसंबे)**



**रोहे : प्रतिनिधी**

शेतकऱ्यांना कृषी विभागाच्या विविध योजनांची माहिती मिळावी, यासाठी रोहा तालुका कृषी विभागाने चणेरा येथे नुकताच कृषी मेळावा आयोजित केला होता. या वेळी शेतीबाबतच्या विविध योजनांची माहिती देऊन तालुका कृषी अधिकारी महादेव करे यांनी उपस्थित शेतकऱ्यांना शेतीचे उत्पन्न कसे वाढवावे याबाबत मार्गदर्शन केले.

केंद्र सरकारच्या प्रधानमंत्री सूक्ष्म अन्नप्रक्रिया योजनेच्या माध्यमातून शेतकरी स्वतःचा विकास कसा करू शकतो, याविषयी मेळाव्यात सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. बिगर शेतकऱ्यांनाही या योजनेचा लाभ घेता येणार आहे. लाभार्थ्यांना या योजनेत ३५ टक्के सबसिडी मिळणार आहे. लाभार्थ्यांला या योजनेत सहभागी होण्यासाठी स्वतः चे १० टक्के भागभांडवल उभारावे लागणार असून उर्वरित ९० टक्के भांडवल बँकेच्या माध्यमातून उभे करावे लागणार आहे. या योजनेच्या माध्यमातून शेतकरी आपल्या शेतीमालावर प्रक्रिया करून स्वावलंबी बनू शकतो, असा विश्वास मेळाव्यात सहभागी झालेल्या शेतकऱ्यांनी व्यक्त केला.

# खालापूर तहसील कार्यालयात प्रतिज्ञापत्र सेवा सुरू

**खोपोली : प्रतिनिधी**

कोविड प्रादूर्भावामुळे खालापूर तहसील कार्यालयातील प्रतिज्ञापत्र (Affidavit) सेवा बंद होती. त्यामुळे प्रतिज्ञापत्र मिळविण्यासाठी अनेकांची फरफट होत होती. नवे तहसीलदार आयुब तांबोळी यांनी प्रतिज्ञापत्र सेवा पुन्हा सुरू केली आहे. ही सेवा आठवड्यातील पाच दिवस सुरू राहणार आहे.

कोरोनाच्या पार्श्वभूमीवर गर्दी होऊ नये, यासाठी शासनाने कडक निर्बंध लागू केले होते. त्यामुळे खालापूर तहसील कार्यालयातील प्रतिज्ञापत्रासह काही सेवा बंद करण्यात आल्या होत्या.

त्यामुळे आवश्यक कागदपत्रे व प्रतिज्ञापत्र मिळविण्यासाठी नागरिकांची फरफट होत होती, तसेच मोठा आर्थिक भुदंड सोसावा लागत होता.

प्रतिज्ञापत्र सेवा सुरू व्हावी, अशी मागणी खालापूर तालुक्यात जोर धरत असताना तहसीलदार आयुब तांबोळी यांनी २४ सप्टेंबरपासून प्रतिज्ञापत्र सेवा पुन्हा सुरू केल्याने अनेकांनी समाधान व्यक्त केले.

# माणगावमध्ये आज गुणवंत शिक्षक पुरस्कारांचे वितरण

**माणगाव : प्रतिनिधी**

कोकण मराठी साहित्य परिषदेच्या माणगाव शाखेतर्फे शनिवारी (दि. २) दुपारी ३ वाजता शहरातील खरे मंगल कार्यालयात गुणवंत शिक्षक पुरस्कार वितरण समारंभ आयोजित करण्यात आला आहे. या वेळी कवयित्री सायराबानू चौगुले यांच्या 'चांदणं शब्दांचं' या काव्यसंग्रहाचे प्रकाशनही करण्यात येणार आहे.

कोमसापच्या माणगाव शाखेतर्फे प्रतिवर्षी गुणवंत शिक्षकांचा सन्मान करण्यात येतो. या वेळी नूतन माध्यमिक विद्यालयाच्या शिक्षिका नीता करकरे व विळे धनगरवाडा येथील प्राथमिक शाळेचे शिक्षक दिगंबर अडीत यांना गुणवंत शिक्षक पुरस्कार जाहीर करण्यात आले आहेत. शनिवारी होणाऱ्या कार्यक्रमात त्यांना हे पुरस्कार मान्यवरांच्या हस्ते प्रदान करण्यात येणार असल्याची माहिती संस्थेच्या अध्यक्ष सायराबानू चौगुले यांनी दिली.

# जिल्हा तक्रार निवारण प्राधिकारीपदी जगन्नाथ साळुंके यांची नियुक्ती

**अलिबाग : जिमाका**

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत रायगड जिल्ह्यासाठी जगन्नाथ सोपान साळुंके (ता. महाड) यांची तक्रार निवारण प्राधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. अलिबाग येथील जिल्हाधिकारी कार्यालयात (रोहयो शाखा) तक्रार निवारण प्राधिकारी जगन्नाथ साळुंके यांचे कार्यालय असून ९४०५५०९९६० हा त्यांचा संपर्कासाठी क्रमांक आहे. महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत जिल्ह्यातील झालेल्या कामांबाबत अडीअडचणी व तक्रारी त्यांच्याकडे दाखल करता येतील, असे उपजिल्हाधिकारी (रोहयो) सुषमा सातपुते यांनी कळविले आहे.

# राष्ट्रवादीबरोबर आघाडी नाहीच!

## श्रीवर्धनमध्ये शिवसैनिकांच्या बैठकीत जिल्हाप्रमुख नवगणेंचा स्वबळाचा नारा

**श्रीवर्धन : प्रतिनिधी**

आगामी नगरपालिका निवडणुकीसाठी कुठल्याही परिस्थितीत राष्ट्रवादी काँग्रेसबरोबर आघाडी होणार नाही. ही निवडणूक आपल्याला स्वबळावर लढवायची आहे, त्यासाठी शिवसैनिकांनी तयारीला लागावे, असे आवाहन शिवसेना जिल्हाप्रमुख अनिल नवगणे यांनी येथे केले.

येऊ घातलेल्या नगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर श्रीवर्धनमधील शासकीय विश्रामगृहात झालेल्या बैठकीत जिल्हाप्रमुख नवगणे कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करीत होते. माजी आमदार तुकाराम सुर्वे, तसेच श्याम भोकरे, सुकुमार तोंडलेकर, सुरेश पाटील, प्रतोष कोलथरकर, अविनाश कोळंबेकर, बाबुराव चोरगे, संतोष वेश्वीकर, अजिंकेश भाटकर आदी पदाधिकाऱ्यांसह नगरसेवक आणि शिवसैनिक या वेळी उपस्थित होते.

पुढील काही दिवसांत प्रभाग आरक्षण सोडत होईल, त्यावर लक्ष ठेवा. त्यातसुद्धा त्यांच्या सोईनुसार बदल करण्याचे प्रकार होत असतात. त्यामुळे सावध राहा, अशा सूचना नवगणे यांनी या वेळी शिवसैनिकांना केल्या.

आमचा कोणी वाली नाही, असे श्रीवर्धनमधील शिवसैनिकांनी समजू नये. जिल्हाप्रमुख म्हणून मी तुमच्या बरोबर आहे. राजकीय दृष्टीने कोणी अंगावर आले, तर सोडायचे नाही. प्रसंगी भानगडी झाल्या तरी चालतील, आम्ही समर्थ आहोत, असा इशाराही जिल्हाप्रमुख नवगणे यांनी या बैठकीत दिला. श्रीवर्धन पंचायत समितीच्या माजी उपसभापती प्राची दुदुस्कर यांनी या वेळी शिवसेनेत प्रवेश केला.

# कर्जतमध्ये मोटरसायकलचोरांना अटक

**कर्जत : प्रतिनिधी**

नाकाबंदीमध्ये मोटरसायकल चोरी करणाऱ्या दोन गुन्हेगारांना पकडण्यात कर्जत पोलिसांना यश आले आहे. या चोरट्यांनी कर्जत आणि खालापूर पोलीस ठाण्याच्या हद्दीत सात मोटरसायकल चोरल्याचे कबूल केले आहे.

रायगड जिल्हा पोलीस दलाकडून २७ सप्टेंबर रोजी ऑलआउट ऑपरेशन जाहीर करण्यात आले होते, त्यानुसार कर्जत पोलिसांनी शहरातील श्रीराम पूल व चारफाटा येथे नाकाबंदी केली होती. त्या वेळी मुरबाड बाजूकडून येणारी संशयित पल्सर मोटरसायकल अडवली आणि मोटरसायकलवरील अनिकेत नंदकुमार जाधव (वय २२, रा. कोषाणे, ता. कर्जत) आणि आकाश गोविंद मोरे (वय २३, रा. भीमनगर परळी, ता. सुधागड) यांना ताब्यात घेतले. त्यांनी एकूण सात मोटरसायकली चोरल्याची कबुली दिली.


### जाहीर नोटीस

सर्व तमाम लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यांत येते की, आमचे अशिलांची मालकीची मौजे– लोहोप, तालुका खालापूर, जिल्हा रायगड येथील खालील वर्णनाची जमीन मिळकत जिचे विद्यमान मालक १) सिताबाई राम पाटील, रा. लोहोप, ता. खालापूर यांचेकडून कायम खरेदी करण्याचे ठरविले आहे.

सदर मिळकतीचे सविस्तर वर्णन खालीलप्रमाणे

| मौजे | भूमापन क्र. | क्षेत्र (हे.आर.पॉ.) | आकार रु.पैसे |
|---|---|---|---|
| लोहप, ता. खालापूर | १/१/अ/२ | जिरायत ०–४३–७०<br>पोटखराबा ०–२७–३० | ७.५६ |
| | | एकूण क्षेत्र ०–७१–०० | |

वरील जमीन मिळकतीशी कोणत्याही इसमांचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हितसंबंध असल्यास आणि त्याची आमचे अशिलांच्या कायम खरेदी कराराचे व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी तसे आम्हांस ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांत लेखी पुराव्यासह खाली नमूद केलेल्या पत्त्यावर कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास वरील मिळकतीशी कोणत्याही इसमांचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्कहितसंबंध नाही. असे समजण्यात येऊन आमचे अशिल वरील मिळकतीच्या कायम खरेदीचे व्यवहार पूर्ण करतील, मागाहून कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

**दिनांक : ०१/१०/२०२१**

**सही/–**
**ॲड. कांचन एस. पाटील**
**पत्ता : १३३७ बी, रुम नं. २, शिवाजी पाटील निवास, प्रभूआळी, जुने पनवेल, जि. रायगड ४१०२०६.**
**फोन : ८६८९८०९८९६, ८१०८८८२६११**


# पाली एसटी बसस्थानकाला सांडपाण्याचा विळखा

## नागरिकांचे आरोग्य धोक्यात

(छाया : धम्मशील सावंत)



**पाली : प्रतिनिधी**



सुधागड तालुक्याचे मुख्यालय व अष्टविनायकाचे स्थान असलेल्या पाली येथील बसस्थानक परिसर गटारातील सांडपाणी व घाणीचे आगार झाले आहे. येथील दुर्गंधीने नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे. स्वच्छता व प्रवाशांना सोयीसुविधा देण्याच्या गंभीर बाबीकडे राज्य परिवहन महामंडळाचे पूर्णपणे दुर्लक्ष होत असल्याने नागरिकांतून संताप व्यक्त होत आहे.

पाली बसस्थानकाचे प्रवेशद्वार असलेल्या मार्गावर दोन मोठे नाले आहेत. त्यामध्ये सांडपाणी तुंबत असून अनेक जीवजंतूंची पैदास होत आहे. हे नाले उघडे असल्याने त्यातून सतत दुर्गंधी येत असते. या नाल्यात अनेकदा वाहने फसून अपघात झाल्याच्या घटना घडल्या आहेत. या नाल्याच्या बाजूने बसस्थानकात एसटी गाड्या शिरतात व बाहेर पडतात. त्यामुळे मोठ्या अपघाताचीदेखील शक्यता आहे.

दोन भल्या मोठ्या व उघड्या नाल्यातून पाली बसस्थानकात मोठ्या प्रमाणावर सांडपाणी व दुर्गंधी पसरत आहे. येथील अस्वच्छता व दुर्गंधी यामुळे बसस्थानक व बाजारपेठेत येणाऱ्या जाणाऱ्या नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे. शाळकरी मुले, वृद्ध प्रवासी, रुग्ण यांना स्थानकातील सांडपाण्यातून ये–जा करावी लागते, त्यामुळे आरोग्य व रोगराईची भीती निर्माण झाली आहे.

बसस्थानक असल्याने या ठिकाणी सतत नागरिकांची वर्दळ व रहदारी सुरू असते, शिवाय सभोवताली दुकाने, हॉटेल, रसवंतीगृह, तसेच मच्छी व मटण मार्केट असल्याने नागरिकांची गर्दी असते. येथील सांडपाण्यामुळे नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला आहे.

कोरोनाचे संकट टळलेले नाही, सर्वत्र स्वच्छता व जनजागृतीवर भर दिला जात आहे. मात्र पाली बसस्थानकात अक्षम्य अस्वच्छता दिसून येत आहे. सांडपाण्यातूनच प्रवाशांना या–जा करावी लागत आहे, त्यामुळे रोगराईची भीती वाढली आहे. याबाबत परिवहन महामंडळाने त्वरित योग्य ती कार्यवाही करावी, असे नियमित प्रवासी मंगेश कदम यांनी सांगितले.


### कर्जत नगरपरिषद, कर्जत, जि. रायगड

### जाहीर सूचना

महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे जतन अधिनियम १९७५ च्या उक्त ८(३) अन्वये या नोटीसीद्वारे असे जाहीर करण्यात येते की,

| अ. | अर्जदाराचे नाव व पत्ता | झाडाचा प्रकार | झाड तोडण्याचे कारण |
|---|---|---|---|
| १ | वैभव कन्स्ट्रक्शन, कर्जत | सुबाभुळ–४, सप्तपर्णी–०३, टाकळा–०५, करंज–०३, निरगळी–०३ | भिसेगाव बिकानेर ते भिसेगाव चार फाटा रस्ता रुंदीकरणात बाधीत होत असल्याने |

सदर प्रस्तावास वृक्ष तोडण्याची परवानगी देण्याचा वृक्षा अधिकारी कर्जत नगरपरिषद इरादा आहे. याबाबत नागरिकांच्या काही सूचना हरकती असल्यास ही जाहीर सूचना प्रसिद्ध झाल्यापासून ०७ दिवसांचे आंत लेखी स्वरूपात या कार्यालयास कळवावे.

**सही/–**
**मुख्याधिकारी तथा वृक्षा अधिकारी**
**कर्जत नगरपरिषद, कर्जत**



**मा. गोडसे सो. यांचे न्यायालयात**
**ॲड. इर्शाद आर. शेख, पनवेल**
**अर्जदारांचे वकील**

**प्रोसेस जमा ता.**

### जाहीर नोटीस

**पनवेल येथील मे. दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर, यांचे कोर्टात.....**

**दि.चौ. अर्ज क्र. १२४३/२०२१**
**नि. ८/ड**
**ने.ता. २९/१०/२०२१**

**१) श्रीमती. शकुंतला दत्ताराम गुरव**
वय – ५६ वर्षे, धंदा – गृहिणी,
**२) सागर दत्ताराम गुरव**
वय – ३९ वर्षे, धंदा – नोकरी
क्र. १ व २, रा. सी–१९, सुपारीबाग बीईएसटी कर्मचारी वसाहत, विठ्ठल चव्हाण मार्ग, परेल, मुंबई ४०००१२
**३) सौ. सारिका प्रकाश गुरव**
वय – ३८ वर्षे, धंदा – गृहिणी,
रा. ३०१, सी विंग, पुष्पधाम सोसायटी, सेक्टर १९, श्रेयस हॉस्पीटलजवळ, नवीन पनवेल, जि. रायगड, ४१० २०६
} **अर्जदार**

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे असे कळविण्यात येते की, अर्जदार क्र. १ यांचे पती आणि अर्जदार क्र. २ व ३ यांचे वडील कै. दत्ताराम भाऊराव गुरव यांचे दि. १३/०५/२०१७ रोजी निधन झाले आहे. कै. दत्ताराम भाऊराव गुरव यांची आई कै. पार्वती भाऊराम गुरव यांचे देखील दि. १३/०३/२००२ रोजी देहावसान झाले आहे. **श्रीमती शकुंतला दत्ताराम गुरव** वगैरे ह्यांनी कै. दत्ताराम भाऊराव गुरव यांच्या मालकीच्या खालील वर्णनाच्या मिळकतीपोटी वारसापत्र मिळण्यासाठी अर्ज केलेला आहे.

कै. दत्ताराम भाऊराव गुरव यांच्या नावे असलेल्या स्थावर मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :

**–: मिळकतीचे वर्णन :–**

मौजे–नवीन पनवेल, ता. पनवेल, जि. रायगड येथील सेक्टर १६ मधील भूखंड क्र. १७, वर बांधण्यात आलेल्या **''क्लासिक कल्पतरू''** या इमारतीचे तिसऱ्या मजल्यावरील निवासी सदनिका क्र. ३०३, क्षेत्र ४११ चौ. फुट बिल्टअप अशा वर्णनाची निवासी सदनिका.

वर **श्रीमती. शकुंतला दत्ताराम गुरव** वगैरे ह्या कै. दत्ताराम भाऊराव गुरव यांचे कायदेशीर वारस आहेत ह्या हक्काबद्दल कोणाही व्यक्तीस हरकती घ्यावयाच्या असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून एका महिन्याच्या आत ह्या मे. कोर्टात प्रत्यक्ष हजर राहून हरकती घ्यावयाच्या आहेत. जर या कालावधीमध्ये योग्य त्या हरकती घेतल्या नाहीत तर हे मे. कोर्ट **श्रीमती. शकुंतला दत्ताराम गुरव** वगैरे, यांच्या हक्काबद्दल पुरावा घेण्याची ताबडतोब कार्यवाही करेल आणि ते जर कै. दत्ताराम भाऊराव गुरव यांच्या वारस पत्रास हक्कवार आहेत असे सिद्ध झाल्यास त्यांना हे वारसपत्र मंजूर करेल.

आज दिनांक ३०/०९/२०२१ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

**सही/–**
**लिपिक**
**दिवाणी न्यायालय**
**व. स्तर, पनवेल**

**कोर्टाचा शिक्का**

**सही/–**
**अधिक्षक**
**दिवाणी न्यायालय**
**व. स्तर, पनवेल**



**MAHATRANSCO**
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

### e-TENDER NOTICE

MSETCL invites online bids (e-Tender) from reputed and registered contractors on Mahatransco e-Tendering Website **https://srmetender.mahatransco.in/** for the following Tender specification.

| Tender No. | Description | Estimated cost |
|---|---|---|
| Tend-15/ 2021-2022 | Installation testing & Commissioning of 80MVAr, reactor(Bus) at 400kV R.S.Kharghar, under 400kV RS(O&M) Dn, Kharghar........ **RFX No. 7000020980** | Rs. 25.27 Lakhs |

EMD 1% of estimated cost and Tender fee Rs.500/- + GST **Submission of bids from 01.10.2021 to 11.10.2021 up to 11.00 hrs, Bid opening date:-11.10.2021** if possible. For further details visit our website **https://srmetender.mahatransco.in/**

**Contact Person:** The Executive Engineer (Adm.)
Tel. No. 022-27459624 / 25.

**Sd/-**
**SUPERINTENDING ENGINEER**
**EHV (O&M) CIRCLE, PANVEL**



**MAHATRANSCO**
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

### E-Tender Extension notice

MSETCL invites online bids (E-Tender) from registered contractors/agencies on Mahatransco E-Tendering website **https://srmetender.mahatransco.in** for following work.

| Tender No.: EE/400kV/RS(O&M)/DN/KHR/Ten-9/21-22 (RFX No. 7000020661) | | | Period for submission of E-Bid: 01.10.2021 to 08.10.2021 up to 23:59 hrs | | |
|---|---|---|---|---|---|
| Name of Work: AMC for Split ACs installed at 400kV R.S. (O&M) Division, Kharghar | | | | | |
| **Estimated Cost** | **EMD (Rs)** | **Tender Fee (Rs)** | **Closing Date** | **Technical opening Date** | **Commercial opening date** |
| Limited to Rs. 5,00,000/- (Including GST) | Rs. 5000/- | Rs.525/- (Including GST) | **08.10.2021 up to 23:59 hrs** | **11.10.2021 at 10:00 hrs (If possible)** | **11.10.2021 at 10:15 hrs (If possible)** |

**Contact Persons:**
1) Mr. V.K. Surpatne, Executive Engineer, 400kV RS O&M Dn., Kharghar, 9769213878
2) Ms. P.C. Deshpande, Dy.EE (O), 400kV RS O&M Dn., Kharghar, 9819313988
For further details visit our website **www.mahatransco.in**

1. Tender documents can be downloaded by only online from aforesaid website.
2] Eligible contractor should submit their bid well in advance instead of waiting till last date.

**MSETCL will not be responsible for non-submission of Bid due to any website related problems.**

**Note :- All eligible interested contractors are mandated to get enrolled on SRM E-Tender portal (New) - https://srmetender.mahatransco.in.**

**Sd/-**
**Executive Engineer,**
**400kV R.S. (O&M) Dn., Kharghar**


# जलशुद्धीकरण केंद्र रखडले

## श्रीवर्धनमधील नागरिक शुद्ध पाण्याच्या प्रतीक्षेत

**श्रीवर्धन : प्रतिनिधी**

पाणीपुरवठा योजनेतील जलशुद्धीकरण केंद्र गेल्या अनेक वर्षांपासून रखडला आहे. त्यामुळे श्रीवर्धनमधील नागरिकांना अशुद्ध पाणी मिळत आहे, ते शुद्ध पाण्याच्या प्रतीक्षेत आहेत.

रानवली पाझर तलावातून श्रीवर्धन शहरात पाणीपुरवठा करण्यात येतो. या योजनेतील ४० ते ४५ वर्षांपूर्वीच्या जुन्या जलवाहिन्या कमकुवत झाल्या असून त्यांना जागोजागी गळती लागली आहे. रानवली पाझर तलावापासून आराठी येथील साठवण टाकीपर्यंतची जलवाहिनी, तसेच श्रीवर्धन शहरातील जलवाहिन्या वारंवार फुटण्याचे प्रकार घडत आहेत. पावसाळ्यात चिखलमिश्रित पाणीपुरवठा होतो. अशुद्ध पाणीपुरवठा होत असल्यामुळे श्रीवर्धन शहरातील नागरिकांना आपल्या घरांमध्ये फिल्टर मशीन बसवायला लागल्या आहेत. या पाणीपुरवठा योजनेत जलशुद्धीकरण केंद्राबरोबरच नवीन जलवाहिन्या टाकणे गरजेचे आहे.

श्रीवर्धन नगर परिषदेमध्ये मागील १५ वर्षांपासून राष्ट्रवादी काँग्रेसची एकहाती सत्ता आहे. प्रत्येक निवडणूक जाहीरनाम्यात पिण्याचे शुद्ध पाणी उपलब्ध करून देणार, असे आश्वासन देण्यात येते, मात्र अद्यापपर्यंत जलशुद्धीकरण केंद्राचे काम सुरू झालेले नाही.

> **पाणीपुरवठा योजनेतील जलशुद्धीकरण केंद्र व नवीन जलवाहिन्या टाकण्याच्या कामाची निविदा मंजूर झाली असून, त्याची वर्कऑर्डरदेखील काढण्यात आली आहे. पुढील दोन आठवड्यातच या कामाला सुरुवात होईल.**
> **–फैसल हुर्जुक, नगराध्यक्ष, श्रीवर्धन नगर परिषद**

श्रीवर्धन पाणीपुरवठा योजनेतील जलशुद्धीकरण केंद्रासाठी अनेक वर्षांपासून निधी मंजूर आहे, मात्र या केंद्रासाठी जागा उपलब्ध होत नसल्याचे कारण सांगून वेळ मारून नेण्यात येत होत, परंतु आता जागाही उपलब्ध झाली आहे. तरीसुद्धा प्रकल्पाचे काम का सुरू झाले नाही, याबाबत नागरिकांमध्ये उलटसुलट चर्चा सुरू आहेत.

शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या योजनेत श्रीवर्धन नगर परिषदेने जलशुद्धीकरण केंद्र उभारावे, तसेच नवीन जलवाहिन्या टाकण्याचे काम तातडीने सुरू करावे, अशी मागणी नागरिकांकडून करण्यात येत आहे.


### उरण नगरपरिषद, उरण

### निविदा सूचना

जा.क्र.:– उ.न.प./आरोग्य/२३१६/२०२१–२२
उरण नगरपरिषद, उरण, जि. रायगड
दिनांक :– ०१/१०/२०२१

उरण नगरपरिषदेच्या हद्दीतील खालील कामाकरिता अनुभवी ठेकेदाराकडून दोन सिलबंद निविदा दरपत्रके मागविणेत येत आहेत.

| अ.क्र. | तपशील | इसारा रक्कम | निविदा फॉर्म फी |
|---|---|---|---|
| १ | उरण नगरपरिषदेची मैला गाडी ठेका पद्धतीने देणेकामी वार्षिक ठेकेदार नियुक्त करणेबाबत. | १,५००/– | १००/– |
| २ | उरण नगरपरिषद हद्दीमध्ये स्वच्छ महाराष्ट्र अभियान अंतर्गत स्वच्छतेसंबंधी जनजागृती करणे. लोकांना स्वच्छतेचे महत्त्व पटवून देणे, कचरा वर्गीकरण संदर्भात जनजागृती करणे, नगरपरिषदेमार्फत चालविल्या जाणाऱ्या घंटागाड्यांचे रुट मॅप ठरविणे व स्वच्छता संबंधित इतर कामे करणेबाबत स्वच्छता दूत नेमणे. | २०००/– | ५००/– |
| ३ | उरण नगरपरिषद हद्दीमध्ये स्वच्छ महाराष्ट्र अभियान अंतर्गत उरण नगरपरिषद हद्दीमध्ये नागरी वस्त्यांमध्ये शहरातील व्यवसायिक क्षेत्रांमध्ये ज्या ठिकाणी वारंवार कचरा टाकला जातो त्या ठिकाणी कचरा टाकला जाऊ नये या करिता टाकण्याच्या ठिकाणी सुशोभिकरण करणे. | २०००/– | ५००/– |

**अटी/शर्ती :–**

१. कोऱ्या निविदा फॉर्मचे नमुने निविदा शुल्क (ना परतावा) नगरपरिषदेच्या लेखा विभागात कार्यालयीन सुट्टीचे दिवस सोडून इतर कार्यालयीन कामकाजाच्या वेळेस दिनांक ०४/१०/२०२१ ते दिनांक १३/१०/२०२१ रोजीपर्यंत रोखीने भरल्यास आरोग्य विभागात सकाळी १०:०० ते सायं. ०५:०० वाजेपर्यंत उपलब्ध होतील.
२. इसारा अनामत दिनांक ०४/१०/२०२१ ते दिनांक १३/१०/२०२१ रोजी सायं. ०४:०० वाजेपर्यंत लेखा विभागात स्विकारली जाईल.
३. सिलबंद निविदा/दरपत्रके दोनस लखोटे पद्धतीने कार्यालयीन सुट्टीचे दिवस सोडून इतर कार्यालयीन कामकाजाच्या वेळेत आवक/जावक विभागात स्विकारण्याची अंतिम दिनांक १४/१०/२०२१ रोजीचे दुपारी ०४:०० वाजेपर्यंत असेल. तसेच मुदतीनंतर आलेल्या निविदा/दरपत्रके स्विकारण्यात येणार नाहीत किंवा त्याबाबत कोणतीही कारणे दिली जाणार नाहीत.
४. निविदा सादर करतेवेळी लखोटा क्र. १ मध्ये इसारा अनामत रोखीने भरलेली मूळ पावती, अनुभवाचे दाखले/नोंदणी प्रमाणपत्र इत्यादी कागदपत्रे सादर करणे बंधनकारक आहे. लखोटा क्र. २ मध्ये उरण नगरपरिषदेने विहित नमुन्यात तयार केलेल्या निविदा फॉर्ममध्ये खाडाखोड न केलेले भरलेले दरपत्रक सादर करणेचे आहे.
५. सिलबंद निविदा/दरपत्रके विहित कालावधीत समक्ष सादर करावयाची आहेत. त्या पोष्टाने पाठविल्यास उरण नगरपरिषद त्यांचा स्वीकार करणार नाही. किंवा त्याबाबत कोणतेही कारण देण्यात येणार नाही.
६. विहित मुदतीत प्राप्त झालेल्या वैध निविदा शक्यतो निविदा स्विकृतीच्या अंतिम दिनी सायं. ०५:०० वाजता किंवा शक्य न झाल्यास लगतच्या दुसऱ्या दिवशी पुरवठादार किंवा त्यांच्या अधिकृत प्रतिनिधी यांचे समक्ष मे. मुख्याधिकारी, उरण नगरपरिषद यांच्या दालनात उघडणेत येईल.
७. कोणतेही निविदा/दरपत्रक पूर्णपणे किंवा अंशत: स्विकारणे किंवा आलेल्या सर्व निविदा/दरपत्रके नाकारण्याचा सर्व अधिकार नगरपरिषदेचे असतील. तसेच कोणतेही कारण न देता निविदा/दरपत्रके रद्द करण्याचा अधिकार नगरपरिषदेस असेल.

**सही/–**
**(संतोष माळी)**
**मुख्याधिकारी**
**उरण नगरपरिषद, उरण**



### –: जाहीर निवेदन :–

विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, कोकण विभाग, नवी मुंबई यांचेकडून कळविण्यात येते की, महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७७अ, ७८, ७८अ अन्वये कोकण विभागातील सहकारी गृहनिर्माण संस्थांवर नेमण्यांत येणाऱ्या प्राधिकृत अधिकारी (प्रशासक) यांचे पॅनेल तयार करण्यासाठी अर्ज शासनातील राज्य शासनाचे गट अ व ब प्रवर्गातील सेवानिवृत्त अधिकारी व कर्मचारी / मान्यताप्राप्त विद्यापीठाची पदवी व सहकार व लेखा पदविका (जी.डी.सी. अँड ए)/उच्चतम सहकार पदविका (एच.डी.सी.) धारक/ चार्टर्ड अकाउंटंट (सी.ए.)/इन्स्टिट्युट ऑफ कास्ट अँड वर्कस अकाउंटंट (आय.सी.डब्ल्यू.ए.)/कंपनी सेक्रेटरी (सी.एस.), सहकार खात्यातील प्रशासन/लेखापरीक्षण विभागातील सेवानिवृत्त अधिकारी/कर्मचारी, नागरी/कर्मचारी सहकारी बँकांमध्ये व्यवस्थापक (किमान ५ वर्षे अनुभव)/कायद्याची पदवी यांचेकडून मागविण्यात येत आहेत.

अर्जाचे विहित नमुने विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, कोकण विभाग, जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, ठाणे/पालघर/रायगड/रत्नागिरी/सिंधुदुर्ग व त्यांचे अधिनस्त तालुका कार्यालयात **दिनांक ०४/१०/२०२१ ते दिनांक ०१/११/२०२१** या कालावधीत कार्यालयीन वेळेत मिळू शकतील. याबाबतची जाहीर सूचना उपरोक्त नमूद कार्यालयाच्या नोटीस बोर्डवर प्रसिद्ध करण्यांत आलेली आहे.

**अर्जासोबत जोडावयाची कागदपत्रे :–**

१. पदवी प्रमाणपत्र आणि जी.डी.सी. अँड ए प्रमाणपत्र
२. वकील असल्यास सनद प्रमाणपत्र
३. संगणकीय ज्ञान असलेबाबत प्रमाणपत्र
४. केवायसी नॉर्मस – जन्म दाखला, रेशन कार्ड, आधार कार्ड, पॅनकार्ड, फोटो इ.
५. अनुभवाचा तपशील – संस्थेचे नांव, कामकाजाचा तपशील पद व कालावधी (पद, कामाचे स्वरूप इ.)

**सही/**
**(आप्पाराव घोलकर)**
**विभागीय सहनिबंधक**
**सहकारी संस्था, कोकण विभाग, नवी मुंबई**

**विमाका/कोवि/२०२१–२०२२/१६९**

आयपीएलचा रनसंग्राम
आजचे सामने
मुंबई वि. दिल्ली (३.३० वा., शारजा)
राजस्थान वि. चेन्नई (७.३० वा., अबुधाबी)

# स्मृतीने रचला विक्रम

## गुलाबी चेंडूच्या कसोटीत शतक



**गोल्डकोस्ट : वृत्तसंस्था**

भारत आणि ऑस्ट्रोलिया महिला क्रिकेट संघांमध्ये सुरू असलेल्या कसोटी सामन्यामध्ये दुसऱ्या दिवशी भारताच्या महिला क्रिकेटपटूंनी आघाडी घेतली आहे. यात भारतीय संघाची सलामीवीर स्मृती मंधाना हिने शतकी खेळी करीत एक विक्रम आपल्या नावे केला आहे. स्मृती ही गुलाबी चेंडूने खेळवण्यात येणाऱ्या कसोटी सामन्यात शतक झळकावणारी पहिली भारतीय महिला क्रिकेटपटू ठरली आहे.

सामन्याच्या दुसऱ्या दिवशी स्मृतीने १७१ चेंडूंमध्ये आपले शतक साजरे केले. गुरुवारी पहिल्या दिवशी पावसामुळे खेळ थांबला तेव्हा स्मृती शतकाच्या जवळ पोहचली होती, मात्र शतक साजरे करण्यासाठी तिला एक दिवसाची वाट पाहावी लागली. दरम्यान, तब्बल १५ वर्षांनंतर भारत आणि ऑस्ट्रेलिया महिला संघांमध्ये पुन्हा एकदा कसोटी सामना होत असताना स्मृतीने आपल्या खेळीने त्यात वेगळीच रंगत आणली आहे.

# हैदराबादला नमवून चेन्नई बाद फेरीत

**शारजा : वृत्तसंस्था**

अखेरच्या षटकापर्यंत लांबलेल्या सामन्यात चेन्नई सुपर किंग्जने सनरायजर्स हैदराबादवर सहा गडी आणि दोन चेंडू राखून विजय मिळवला. याबरोबरच महेंद्रसिंह धोनीच्या नेतृत्वाखालील चेन्नई हा इंडियन प्रीमियर लीग (आयपीएल) क्रिकेटच्या यंदाच्या हंगामात बाद फेरी गाठणारा पहिला संघ ठरला.

हैदराबादने दिलेले १३५ धावांचे लक्ष्य चेन्नईने १९.४ षटकांत गाठले. धोनीनेच (नाबाद १४) षटकार लगावून चेन्नईच्या नवव्या विजयावर थाटात शिक्कामोर्तब केले. सुरुवातीला महाराष्ट्राचा ऋतुराज गायकवाड (४५) आणि फॅफ ड्यू प्लेसिस (४१) यांनी चेन्नईसाठी ७५ धावांची सलामी दिली, मात्र जेसन होल्डरने या दोघांसह सुरेश रैनाला (२) बाद करून रंगत निर्माण केली. मोईन अलीसुद्धा (१७) फार काळ टिकू शकला नाही, परंतु धोनीने अंबाती रायुडूच्या (नाबाद १७) साथीने पाचव्या गड्यासाठी ३१ धावांची भर घालून चेन्नईचा विजय साकारला.

तत्पूर्वी, जोश हेझलवूड आणि ड्वेन ब्राव्होच्या प्रभावी गोलंदाजीमुळे हैदराबादला २० षटकांत ७ बाद १३४ धावांपर्यंतच मजल मारता आली. वृद्धिमान साहाने ४४ धावा केल्याने हैदराबादने किमान सव्वाशे धावांचा टप्पा गाठला.
























दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. –मुख्य संपादक

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अँण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com